

पनवेल : शहरातील मिडलक्लास हाऊसिंग सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने सोसायटी मैदानात आयोजित रावण दहन आणि रामलीला कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. प्रभू श्रीरामांच्या जयघोषात पार पडलेल्या या सोहळ्याला मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून विजयादशमीचा उत्सव उत्साहात साजरा केला.

रायगड, नवी मुंबई
• वर्ष १९ • अंक ९४
www.ramprahar.com

# राम प्रहर

• बुधवार, २१ ऑक्टोबर २०२६ • पाने ८ • किंमत ₹२

# रामराज्यातूनच विकसित भारत साकारणार

## विजयादशमीला पंतप्रधान मोदींचा हुंकार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विजयादशमीच्या पावन मुहूर्तावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला विकसित आणि आत्मनिर्भर भारताचा मंत्र दिला. दिल्लीतील आयपी एक्सटेंशनच्या डीडीए मैदानावर इंद्रप्रस्थ रामलीला समितीने गेल्या २५ वर्षांपासून सुरू असलेल्या भव्य दसरा उत्सवात सहभागी होत पंतप्रधान मोदींनी रावण दहन केले आणि रामराज्याचा खरा अर्थ देशवासीयांना समजावून सांगितला.

या सोहळ्यात पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज भारताचा कानाकोपरा रामाने भरला आहे. हा असत्यावर सत्याच्या विजयाचा उत्सव आहे. रामराज्य म्हणजे सर्वांना न्याय, कोणताही भेदभाव नाही. श्रीरामाच्या जीवनातून आपल्याला शिकायला मिळते की कितीही कठीण परिस्थिती आली तरी दुसऱ्यावर अवलंबून न राहता स्वतःच्या शक्तीवर विश्वास





ठेवावा. देशभरात सुरू असलेल्या रामलीलांचा उल्लेख करत मोदी म्हणाले, हा केवळ उत्सव नाही तर भगवान श्रीरामाचे आदर्श जिवंत ठेवण्याची परंपरा आहे. गरीब आणि वंचितांच्या सेवेला प्राधान्य हेच खरे रामराज्य आहे.

मोदी सरकारने गेल्या १० वर्षांत हाच आदर्श समोर ठेवून गरीब कल्याणाच्या योजना राबवल्या आहेत हे यावेळी अधोरेखित झाले. विकसित भारत, आत्मनिर्भर भारत हेच आपले लक्ष्य असून त्यासाठी प्रभू रामाकडून प्रेरणा घ्यायला हवी, असे आवाहन त्यांनी केले. जेव्हा राष्ट्रात आत्मसन्मानाची भावना असते, तेव्हाच सर्वांगीण प्रगती होते. शतकानुशतके आपला वारसा लुटला गेला, पण मोदी सरकारच्या काळात तो वैभवशाली वारसा परत येत आहे. गेल्या १२ वर्षांत १००हून अधिक प्राचीन मूर्ती भारतात परत आणल्या गेल्या आहेत. अयोध्येतील भव्य राम मंदिर निर्मितीपासून ते काशी विश्वनाथ कॉरिडॉरपर्यंत सांस्कृतिक पुनरुत्थानाचे काम भाजप सरकारनेच करून दाखवले आहे.

या सोहळ्याला दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, केंद्रीय राज्यमंत्री आणि दिल्ली भाजप अध्यक्ष हर्ष मल्होत्रा उपस्थित होते. रावणाच्या पुतळ्याचे दहन करून मोदींनी भ्रष्ट व्यवस्थेविरुद्ध लढ्याचा संदेश दिला. भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारच सामान्य माणसाला न्याय देऊ शकते, असा विश्वास यावेळी उपस्थितांमध्ये दिसून आला.

# भारतात रेजिम चेंज होणार नाही

## सरसंघचालक मोहन भागवत यांचा दसरा मेळाव्यात विश्वास

**नागपूर : प्रतिनिधी**

येथे झालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमी उत्सवात सरसंघचालक मोहन भागवत यांनी देशातील सध्याच्या आंदोलनांवर आणि 'रेजिम चेंज'च्या चर्चेवर थेट भाष्य केले आहे. भारतातही सत्ता बदल घडवून आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत, मात्र ते यशस्वी होणार नाहीत, असे ठाम वक्तव्य त्यांनी केले.



भागवत म्हणाले की, पश्चिमेकडून एक वादळ आले आहे. फ्रान्समध्ये काय सुरू आहे, अल्बानियात काय सुरू आहे याकडे पाहा. यापूर्वी बांगलादेशात, नेपाळमध्ये काय झाले ते पाहा. ते म्हणतात रेजिम बदलल्याने परिस्थिती बदलेल, पण असे कधीच घडले नाही. भारतातही असे प्रयत्न सुरू आहेत. या आसुरी शक्तींचे उद्दिष्ट भारत, हिंदू आणि संघाला तोडणे हेच आहे. त्यांना भारतातही काही स्वार्थी प्रवृत्तीच्या लोकांकडून आणि महत्त्वाकांक्षी नेत्यांकडून मदत मिळते. भागवत पुढे म्हणाले की, भारतात दशकभरापासून सक्षम नेतृत्व सुरू आहे. आता जे सुरू आहे ते शूद्र सत्ता स्वार्थामुळे सुरू आहे. आपला देश प्रगती करत आहे, मात्र समस्या आहेतच. त्यामुळे आंदोलन होणारच, पण आंदोलन समाधानासाठी झाले पाहिजे.

दरम्यान, आंदोलनातून कधीही द्वेष निर्माण होऊ नये. आंदोलनातून केवळ समाधान मिळेल का, असा सवालदेखील त्यांनी उपस्थित केला. आंदोलनांनी केवळ मतांसाठी किंवा स्वस्त प्रसिद्धीसाठी काम करू नये. चांगल्या भाषेचा वापर झाला पाहिजे, संवाद झाला पाहिजे, त्याचबरोबर मर्यादेचे पालनदेखील झाले पाहिजे, असेही त्यांनी यावेळी आपल्या भाषणात नमूद केले.

# खरी मतचोरी २०१९ला झाली

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंवर घणाघात

**मुंबई : प्रतिनिधी**

दसरा मेळाव्याच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर सडकून टीका केली आहे. एसआयआरच्या मुद्द्यावरून आणि ईव्हीएम मशीनच्या घोटाळ्याच्या आरोपावरून त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर थेट निशाणा साधला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, अरे, तुम्ही



मुख्यमंत्री झालात, तुम्ही कुठे निवडून आलात? मागच्या दाराने तुम्ही मुख्यमंत्री झालात. महाराष्ट्राच्या पाठीत खंजीर खुपसून तुम्ही मुख्यमंत्री झालात. मतचोरीची भाषा तुम्ही करता, पण खरी मतचोरी २०१९ला झाली आहे, अशा शब्दांत त्यांनी उद्धव ठाकरेंचा समाचार घेतला.

देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढण्यात आला आहे. हा मोर्चा म्हणजे देशातील न्यायव्यवस्थेचा अपमान आहे, असेही उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

## २७ देशांतील भारतीय विद्यार्थ्यांकडून निवडणूक आयोगाचे समर्थन

**मुंबई : प्रतिनिधी**

जगातील २७ देशांमध्ये राहणाऱ्या भारतीय वंशाच्या ४०० पेक्षा जास्त विद्यार्थी आणि संशोधकांनी भारतीय निवडणूक आयोगाचे जोरदार समर्थन केले आहे. विरोधी पक्षाने निवडणूक आयोगाविरुद्ध घेतलेल्या भूमिकेवर त्यांनी टीका करत भारताला अराजकतेपासून वाचवा, अशी हाक दिली आहे. याबाबत त्यांनी संयुक्त निवेदन प्रसिद्ध केले आहे.

या निवेदनावर स्वाक्षरी करणाऱ्यांचे म्हणणे आहे की, अशा भूमिकेमुळे देशाच्या संवैधानिक संस्थांवरील लोकांचा विश्वास कमी होऊ शकतो. या संयुक्त निवेदनावर स्वाक्षरी करणाऱ्यांनी सीजेपी प्रमुख अभिजीत दिपके यांनाही त्यांच्याच भाषेत आव्हान दिले आहे.




**पनवेल : डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशन, भारतीय बौद्ध महासभा, बौद्धजन पंचायत समिती, बौद्ध धम्म प्रचार–प्रसार समिती व त्रिरत्न बौद्ध महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ७०व्या धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळ्यात भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, सभागृहनेते अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, संस्था संघटनांचे पदाधिकारी यांच्यासह भीम अनुयायांनी उपस्थित राहून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.**

## निवडक

### कुर्ल्यात इमारतीला भीषण आग; चिमुकल्यासह नऊ जण जखमी

**मुंबई** : कुर्ला पश्चिम परिसरात मंगळवारी पहाटे आगीची गंभीर घटना घडली. कोहिनूर इमारत क्रमांक ५मधील इलेक्ट्रिक डक्टमधील वायरिंगने अचानक पेट घेतला. मोठ्या प्रमाणात धूर पसरल्याने रहिवाशांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. या घटनेत पाच वर्षांच्या मुलासह नऊ जण जखमी झाले. सुदैवाने अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले. सर्व जखमींची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे.

### दिवंगत सिंधुताई सपकाळ यांच्या दत्तक मुलावर गुन्हा दाखल

**अमरावती :** ज्येष्ठ समाजसेविका दिवंगत सिंधुताई सपकाळ यांच्या दत्तक मुलाविरोधात पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दत्तक घेतलेला मुलगा अरुण सपकाळ यांच्या विरोधात लैंगिक छळाचा आरोप झाल्याने अमरावतीत खळबळ उडाली आहे. दिवंगत सिंधुताई यांनी स्थापन केलेल्या सावित्रीबाई फुले मुलींच्या वसतिगृहातील अल्पवयीन मुलीने कथित लैंगिक छळाचा आरोप अरुण सपकाळ यांच्यावर केला आहे.

# पनवेलमध्ये दुर्गामाता महादौड उत्साहात

## आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील यांचा सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमध्ये विजयादशमी अर्थात दसऱ्याच्या मंगल पर्वावर आयोजित दुर्गामाता महादौड उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, पनवेल तालुका यांच्या वतीने काढण्यात आलेल्या महादौडीत विविध गावांतील धारकरी, शिवभक्त आणि हिंदू बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सकाळी ६ वाजता धारकऱ्यांचे एकत्रीकरण करण्यात आले. त्यानंतर सकाळी ७.३० वाजता शिवतीर्थ, पनवेल येथील पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ स्मारक येथून महादौडीला प्रारंभ झाला. यावेळी पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, नगरसेवक रोहित झुंजारराव आणि गणेश कडू उपस्थित होते.



जय भवानी, जय शिवाजीच्या जयघोषाने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. महादौडीचा मार्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, लाईन आळी, गावदेवी मंदिर, सावरकर चौक, वाल्मिकी नगर, जय भारत नाका, टपाल नाका आणि उरण नाका असा होता. त्यानंतर पंचरत्न हॉटेलमार्गे महादौड पुन्हा शिवतीर्थ, पनवेल येथील पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ स्मारक येथे पोहचली. या ठिकाणी महादौडीची सांगता झाली. महादौड मार्गावर अनेक ठिकाणी भगव्या ध्वजाने महादौडीचे स्वागत करण्यात आले. महिला आणि नागरिकांनी औक्षण करून सहभागी धारकऱ्यांचे स्वागत केले. या स्वागतामुळे संपूर्ण मार्गावर भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले.

छत्रपती शिवाजी महाराजांचे हिंदवी स्वराज्य, राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांचे संस्कार व जगदंबा तुळजाभवानी यांच्या प्रेरणेतून राष्ट्रभक्ती, धर्मनिष्ठा, शौर्य व हिंदू समाजातील एकात्मतेची भावना दृढ करण्याचा संदेश महादौडीतून देण्यात आला.

संभाजीराव भिडे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात येतो. महादौडीमुळे सहभागी धारकऱ्यांमध्ये उत्साह व प्रेरणेचे वातावरण निर्माण झाले. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवरांचे, धारकऱ्यांचे, शिवभक्तांचे आणि नागरिकांचे शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, पनवेल तालुका यांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

# विमानातील बेशुद्ध वृद्धासाठी अलिबागचे डॉ. साठ्ये ठरले देवदूत

**अलिबाग : प्रतिनिधी**

पॅरिसहून मुंबईला येणाऱ्या विमानात ७५ वर्षीय वृद्धाचे प्राण वाचवून अलिबागचे डॉ. चंद्रशेखर साठ्ये देवदूत ठरले आहेत. प्रतिकूल परिस्थितीत आणि मर्यादित वैद्यकीय संसाधनांच्या मदतीने त्यांनी वृद्धावर यशस्वी उपचार केले. विशेष म्हणजे एअर फ्रान्सने वैद्यकीय सेवेबद्दल देऊ केलेले ३५० युरो त्यांनी नम्रपणे नाकारले.

डॉ. साठ्ये एअर फ्रान्सच्या एफ–२१८ विमानाने पॅरिसहून मुंबईला येत होते. उड्डाणानंतर सुमारे चार तासांनी विमानातील ७५ वर्षीय वृद्धाची प्रकृती अचानक बिघडली आणि ते आसनावर बेशुद्ध पडले. कर्मचाऱ्यांनी विमानात डॉक्टरचा शोध सुरू केला असता शेजारील प्रवाशाने डॉ. साठ्ये यांना माहिती

## ३५० युरोची मदतही नाकारली



दिली. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता धाव घेत तपासणी केली. वृद्ध बेशुद्धावस्थेत होता, कोणताही प्रतिसाद देत नव्हता. नाडी क्षीण, श्वास सुरू होता, रक्तातील ऑक्सिजन ९० टक्क्यांपर्यंत खालावला होता आणि रक्तदाब कमी होत होता. डॉ. साठ्ये यांच्या सूचनेवरून प्रवाशाला मोकळ्या जागेत खाली झोपवण्यात आले. विमानात असलेले स्वयंचलित रक्तदाबमापक, पल्स ऑक्सिमीटर, स्टेथोस्कोप, ऑक्सिजन, **(पान २...)**

# पनवेलमध्ये झंकार नवरात्रोत्सवाची धूम

## विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शहरातील मिडल क्लास हौसिंग सोसायटीच्या प्रांगणात सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला झंकार नवरात्रोत्सव यंदाही नागरिकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. नवरात्रोत्सवाच्या आठव्या माळेला पारंपरिक संगीताच्या तालावर गरबा व दांडिया खेळण्यासाठी पनवेलकरांनी मोठी गर्दी केली होती. उत्साह, भक्ती व पारंपरिक संस्कृतीचा सुरेख संगम या सोहळ्यात पाहायला मिळाला.

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)



नवरात्रोत्सवाच्या शेवटच्या दिवशी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, पनवेलचे महापौर नितीन पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, सभापती अजय बहिरा, नगरसेविका दर्शना भोईर, नगरसेवक मनोज भुजबळ, दशरथ म्हात्रे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थिती लावली. रात्री १२ वाजेपर्यंत रंगलेल्या सांस्कृतिक सोहळ्यात लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनीच पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत गरबा व दांडियाचा आनंद लुटला. संगीताच्या तालावर थिरकणाऱ्या नागरिकांमुळे संपूर्ण परिसर उत्सवी वातावरणाने भारावून गेला होता. उत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या दांडिया स्पर्धेत बालकलाकारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. तसेच उत्कृष्ट गरबा सादर करणाऱ्या गुणवंत स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

बक्षीस वितरण सोहळ्यामुळे सहभागी स्पर्धकांचा उत्साह वाढला, तर उपस्थितांनीही टाळ्यांच्या गजरात कलाकारांना प्रोत्साहन दिले. पारंपरिक संस्कृतीचे जतन, सामाजिक एकोपा व नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे झंकार नवरात्रोत्सवाने पनवेलकरांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे.

# कोकणला दुहेरी भेट; महामार्गाला गती

## रत्नागिरीत शीतगृह

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

मुंबई ते गोवा प्रवास जलद आणि सुखकर करण्यासाठी प्रस्तावित कोकण द्रुतगती महामार्गाच्या कामाला आता गती मिळाली आहे, तर दुसरीकडे कोकणातील शेतकऱ्यांसाठी रत्नागिरीत २००० टन क्षमतेचे शीतगृह उभारण्याचा निर्णय झाला आहे. या दोन्ही प्रकल्पांमुळे कोकणच्या पर्यटन, व्यापार आणि कृषी अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने कोकण द्रुतगती महामार्गाच्या सविस्तर प्रकल्प आराखड्याचे काम पुढील तीन महिन्यांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. राज्य सरकारने २०२०मध्ये या महामार्गाची घोषणा केली होती. मुंबई–गोवा महामार्गाचे काम सतत रखडत असल्याने आणि प्रवासासाठी जास्त वेळ लागत असल्याने स्वतंत्र द्रुतगती




महामार्गाची गरज निर्माण झाली होती. नव्या माहितीनुसार हा महामार्ग सुमारे ३८८ किलोमीटर लांबीचा आणि सहा पदरी असणार आहे. यासाठी सुमारे २५ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. हा महामार्ग पूर्ण झाल्यास मुंबई ते कोकण हा प्रवासाचा वेळ तब्बल तीन ते चार तासांनी कमी होणार आहे. या महामार्गासाठी सुमारे ४२०५ हेक्टर जमीन संपादित करावी लागणार आहे.

### नाशवंत उत्पादनांची होणार साठवणूक

कोकण रेल्वे आणि केंद्रीय वखार महामंडळ यांच्या करारानुसार रत्नागिरी येथे २००० टन क्षमतेचे शीतगृह उभारले जाणार आहे. या प्रकल्पासाठी कोकण रेल्वे जमीन उपलब्ध करून देणार असून सीडब्ल्यूसी निधी पुरवणार आहे. या शीतगृहाचे बांधकाम १८ महिन्यांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. शीतगृहात हापूस आंबा, काजू, कोकम, मासे, दुग्धजन्य पदार्थ आणि इतर नाशवंत उत्पादनांची साठवणूक करता येणार आहे. यामध्ये उणे २१ ते ४ अंश सेल्सिअस तापमानाचे स्वतंत्र कक्ष असतील.

# नवी मुंबईतील हवा प्रदूषणात वाढ; सलग तीन दिवसांपासून स्तर खालावला

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील हवा गुणवत्ता निर्देशांकात सलग तीन दिवस वाढ झाल्याने प्रदूषणाची चिंता वाढली आहे. रविवारी (१८ ऑक्टोबर) हा निर्देशांक १४७ वर पोहोचला. सोमवारी (१९ ऑक्टोबर) शहराचा एकत्रित निर्देशांक काहीसा कमी होऊन १२३ झाला असला, तरी महापे आणि वाशीतील कोपरीगाव परिसरातील नोंदी तुलनेने अधिक नोंदविल्या गेल्या. वाढती वाहनसंख्या, बांधकामांमधून उडणारी धूळ आणि औद्योगिक क्षेत्रातील संभाव्य उत्सर्जनाच्या पार्श्वभूमीवर शहरातील हवेच्या गुणवत्तेकडे गांभीर्यपूर्वक लक्ष देऊन ठोस उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.



पावसाळ्यात रस्त्यांवरील धूलिकण खाली बसतात. पाऊस ओसरल्यानंतर रस्ते कोरडे होऊ लागल्याने वाहनांच्या वर्दळीमुळे धूळ पुन्हा हवेत मिसळते. नवी मुंबईतील विविध भागांत सुरू असलेली बांधकामे, बांधकाम साहित्याची वाहतूक आणि वाहनांच्या धुरातून बाहेर पडणारी प्रदूषके यांचाही हवेच्या गुणवत्तेवर परिणाम होत आहे. सप्टेंबर महिन्यानंतर वातावरणात होणारे बदल आणि वाऱ्याचा कमी झालेला वेग यांमुळेही अनेक भागात ही प्रदूषके स्थिरावत असल्याने सकाळी आणि रात्री धुरकट वातावरण जाणवत असल्याचे सांगितले जात आहे.

शहराच्या एकत्रित निर्देशांकात सोमवारी घट झाली असली, तरी स्थानिक पातळीवरील नोंदींमध्ये फरक दिसतो. शुक्रवारी (१६ ऑक्टोबर) शहराचा निर्देशांक ११७, शनिवारी (१७ ऑक्टोबर) १३४ आणि रविवारी १४७ होता. तीन दिवसांत निर्देशांकात ३० अंकांची वाढ पहायला मिळाली. सोमवारी तो १२३ वर आला. हवा गुणवत्ता निर्देशांकात जरी चढ–उतार दिसत असला तरी शहरातील एकूण हवा गुणवत्ता निर्देशांक सातत्याने १०० च्या वर राहिल्यास आगामी काळात नागरिकांसाठी चिंतेचा विषय ठरू शकतो. वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत, हे विचारण्यासाठी नवी मुंबईतील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद मिळू शकला नाही.

तुर्भे आणि पावणे एमआयडीसीलगतच्या वाशी, कोपरीगाव, कोपरखैरणे, बोनकोडे आणि घणसोली परिसरात रात्री तसेच पहाटे उग्र वास येत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत. वाशीतील पावणेश्वर उड्डाण पुलावरून प्रवास करणाऱ्यांना दिवसाही या उग्र वासाचा सामना करावा लागत आहे. काही नागरिकांनी हा वास रासायनिक पदार्थ जळल्यासारखा असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील उत्सर्जनाची तपासणी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

सानपाड्यात बांधकामांच्या धुळीचा प्रश्न सानपाडा येथील पामबीच मार्गालगत सुरू असलेल्या विकासकामांमुळे उडणाऱ्या धुळीचा प्रश्नही यानिमित्ताने चर्चेत आला आहे. बांधकामस्थळांवरील माती, सिमेंट आणि इतर साहित्याची हाताळणी करताना धूळ हवेत मिसळू शकते. त्यामुळे बांधकामस्थळी धूळ नियंत्रणाच्या उपाययोजनांची अंमलबजावणी होते का, याची महापालिकेने पाहणी करणे आवश्यक आहे. रस्त्यांची नियमित स्वच्छता, बांधकाम साहित्याचे आच्छादन आणि धूळ उडू नये यासाठी योग्य उपाययोजना केल्यास प्रदूषण कमी करण्यास मदत होऊ शकेल असे स्थानिक रहिवाशांचे म्हणणे आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वर्गीकरणानुसार, शून्य ते ५० हा हवा गुणवत्ता निर्देशांक चांगला, ५१ ते १०० समाधानकारक, १०१ ते २०० मध्यम, २०१ ते ३०० खराब, ३०१ ते ४०० अतिखराब आणि ४०१ ते ५०० गंभीर मानला जातो. त्यामुळे नवी मुंबईतील १२३ ते १४७ या नोंदी मध्यम प्रदूषणाच्या श्रेणीत येतात. या पातळीवर दमा किंवा फुफ्फुसांचे विकार असलेल्या व्यक्ती, हृदयविकाराचे रुग्ण, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना श्वसनाचा त्रास जाणवू शकतो. निर्देशांक २०१ च्या पुढे गेल्यास दीर्घकाळ प्रदूषित हवेत राहणाऱ्या अधिक लोकांना श्वास घेण्यास त्रास होण्याची शक्यता असते; ४०१ च्या पुढील गंभीर पातळीवर निरोगी व्यक्तींनाही परिणाम होऊ शकतो.

वातावणतील बदलांमुळे शहरातील अनेक भागांत सकाळी आणि रात्रीच्या वेळी धुरकटपणा जाणवत असून, या मागील नेमकी कारणे शोधण्यासाठी विभागातर्फे काम सुरू आहे. हवेतील धूलिकण कमी करण्यासाठी महापालिकेच्या माध्यमातून सखोल स्वच्छता मोहीम राबवण्यात येत असून, फॉगर यंत्रणेद्वारे धूलिकणांवर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न केले जात आहेत. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला देखील औद्यागिक वसाहतीमधील प्रदूषण तपासण्यासाठी पत्र व्यवहार करण्यात आला असून, महापालिका आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांसोबत या भागात लवकरच संयुक्त तपासणी देखील करण्यात येणार आहे.

## श्रीवर्धनच्या पेशवेकालीन लक्ष्मी–नारायण मंदिरात ‘पीठाची महालक्ष्मी’ सोहळा

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

कोकणच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभवाची साक्ष देणाऱ्या श्रीवर्धन येथील पेशवेकालीन श्री लक्ष्मी नारायण मंदिरात अश्विन शुद्ध सप्तमीच्या निमित्ताने पारंपरिक ‘पीठाची महालक्ष्मी’ सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.



शतकानुशतके जपल्या जाणाऱ्या या वैशिष्ट्यपूर्ण धार्मिक परंपरेमुळे मंदिर परिसरात मंगलमय वातावरण निर्माण झाले होते. ब्राह्मण समाजाच्या वतीने या उत्सवाचे वर्षानुवर्षे नियोजन करून विधिवत पूजन केले जाते. श्रीवर्धनच्या ऐतिहासिक धार्मिक परंपरेचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणारा हा सोहळा भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र ठरला आहे.

पेशव्यांचे मूळ गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीवर्धन नगरीला ऐतिहासिक वारशाबरोबरच समृद्ध धार्मिक परंपरेची जोड लाभली आहे. येथील श्री लक्ष्मी नारायण मंदिर हे भट पेशवे घराण्याशी संबंधित महत्त्वाचे ऐतिहासिक मंदिर मानले जाते. मंदिरातील काळ्या पाषाणातील श्री विष्णूची देखणी मूर्ती, तिची वैशिष्ट्यपूर्ण स्थापत्यशैली आणि मंदिराशी जोडलेला इतिहास यामुळे या देवस्थानाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे येथील प्रत्येक पारंपरिक उत्सवाला धार्मिकतेसोबतच ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्वही लाभते.

शारदीय नवरात्रोत्सवात अश्विन शुद्ध सप्तमीला ‘पीठाची महालक्ष्मी’ पूजनाची परंपरा विशेष श्रद्धेने पाळली जाते. पारंपरिक पद्धतीने पिठापासून देवीचे प्रतीक किंवा मुखवटा तयार करून त्याची विधिवत प्रतिष्ठापना केली जाते. त्यानंतर देवीची पूजा–अर्चा करून तिला पारंपरिक नैवेद्य अर्पण केला जातो. या वैशिष्ट्यपूर्ण पूजनामुळे या उत्सवाला ‘पीठाची महालक्ष्मी’ असे नाव पडले आहे.

## श्रीवर्धन पोलिसांची मोठी कारवाईः हातभट्टी दारू व रसायन जप्त; चार जणांवर गुन्हे दाखल

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

श्रीवर्धन पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारू धंद्यांविरुद्ध पोलिसांनी कडक पाऊल उचलले आहे. दिनांक १७ ऑक्टोबर रोजी मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे श्रीवर्धन पोलिसांनी धडक कारवाई करत सुमारे ५५,५०० रुपये किमतीची गावठी हातभट्टीची तयार दारू, बिअरच्या बाटल्या आणि दारू तयार करण्यासाठी लागणारे रसायन जप्त केले आहे. या प्रकरणी ४ आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



१७ ऑक्टोबर रोजी सकाळी सुमारे ६.०० वाजण्याच्या सुमारास गालसुरे काठी व निगडी काठी येथे बेकायदेशीरपणे गावठी हातभट्टीच्या दारूची विक्री सुरू असून दारू तयार करण्याचे रसायन बाळगण्यात आल्याची खात्रीशीर बातमी गुप्त बातमीदाराकडून मिळाली. या बातमीची तात्काळ दखल घेत श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. सुरेंद्र गरड यांच्या आदेशाने दोन स्वतंत्र पथके तयार करण्यात आली.पोलीस उपनिरीक्षक श्री. प्रदिप राठोड व त्यांच्या पथकाने गालसुरे काठी आणि निगडी काठी या दोन्ही ठिकाणी एकाच वेळी छापा टाकून आरोपींच्या ताब्यातील हातभट्टीची तयार दारू आणि रसायन हस्तगत केले.तसेच खाडी किनाऱ्यावर ठिकठिकाणी लपवून ठेवण्यात आलेले बेवारस रसायन पोलिसांकडून जागीच नष्ट करण्यात आले.

रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक श्रीमती आँचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. अभिजित शिवथरे, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राजु सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड, पोलीस उपनिरीक्षक प्रदिप राठोड व त्यांच्या सहकाऱ्यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव साजरा

**खोपोली : प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ खालापूर तालुका यांच्या वतीने खोपोली शहरातील ब्राह्मण सेवा संघ सभागृहात विजयादशमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी संघपरंपरेनुसार ध्वजारोहण सांघीक पद्य, वैयक्तिक पद्य, अमृत वचन सादर करण्यात आले.



या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून कुलकर्णी (कल्याण) उपस्थित होते यावेळी त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कारकीर्दीचा विस्तृतपणे आढावा घेतला. संघाचे आद्य सरसंघचालक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार यांच्या कार्याचाही आढावा घेतला. स्वातंत्र्यपूर्व काळात १९२५ मध्ये संघाची स्थापना करण्यात आली. त्यावेळी संघाला झालेला विरोध व त्यानंतर संघाचा खडतर प्रवास यावर प्रमुख वक्ते यांनी घडामोडीवर सविस्तर विश्लेषण केले.

नागपूरच्या एका वाड्यात डॉक्टर हेडगेवार यांनी काही सवंगड्यांच्या मदतीने संघाची स्थापना केली. डॉक्टर हेडगेवार १९२५ ते १९४० या दरम्यान अत्यंत पंधरा वर्षाच्या कालावधीत अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत संघ कार्याची धुरा वाहिली. पुढे संघातील कार्यकर्त्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात वेगवेगळ्या माध्यमातून राष्ट्रसेवा प्रति संघटना उभारल्या. आणि त्या देश विदेशातआजही सुरू आहे. राष्ट्रप्रेम व समाजाची सेवा या माध्यमातून संघकार्य देशातच नव्हे विदेशातही संघाच्या शाखा सुरू करण्यात आले आहे. संघाचे कार्य देशाच्या वेगवेगळ्या भागात सुरू करण्यासाठी प्रचारक व विस्तारक या कार्यपद्धतीमुळे संघाचा कार्य पुढे सातत्याने सुरू आहे.

या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर जिल्हा सहकार्यावाह प्राध्यापक अविनाश मोरे, शहर कार्यावर संतोष गंडेवार, उपस्थित होत कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पतसंचलन विविध भागातून काढण्यात आले.

## राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत सुधागड विद्या संकुलाचे यश



**कळंबोली :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने रायगड लॉन्स ,भोसे,जि.पंढरपूर येथे १७ वर्षाखालील ९२ किलो वजनी गटाची शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या मध्ये कळंबोली येथील सुधागड विद्या संकुलाचा विद्यार्थी स्वप्नील किशोर लावंड या विद्यार्थ्यांने सुवर्णपदक जिंकून त्याची राष्ट्रीय कुर्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

स्वप्नील लावंड हा ९ वी चा विद्यार्थी असून तो विविध ठिकाणी होणाऱ्या कुस्ती स्पर्धेत यशस्वी होत असून सुधागड विद्या संकुलाचे नावलौकिक वाढवत आहे.तसेच याच संकुलाची विद्यार्थीनी सानिका सत्रे हिने १७ वर्षाखालील ६५ किलो वजनी गटात कांस्य पदक मिळविले आहे. हि विद्यार्थीनी ११ वी सायन्स मध्ये शिकत आहे. स्वप्नील लावंड व सानिका सत्रे हिने मिळविलेल्या यशाबद्दल संकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी अभिनंदन केले आहे.

## विवाहितेचा छळ; पाच जणांविरुद्ध गुन्हा

**महाड : प्रतिनिधी**

विवाहितेचा मानसिक व शारीरिक छळ केल्याप्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यात पतीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माहेरून काही आणले नाही, असे म्हणत शिवीगाळ करणे, तलाक देण्याची धमकी देणे, तसेच फिनेल व कफ सिरप पाजल्याचा आरोप विवाहितेने पोलिसात दिलेल्या तक्रारीत केला आहे. याशिवाय मोबाईलच्या चार्जरच्या वायरने मारहाण करण्यात आली असल्याचाल ही आरोप आहे.हा गुन्हा १२/५/२०२४ ते १६/२/२०२६ या दरम्यान तिच्या सासरी राहत्या घरी वरवटणे येथे घडला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी सारा यांचे समीर तालिब रा. वरवटणे, तालुका म्हसळा यांच्या जवळ लग्न झाल्यानंतर १२ मे २०२४ ते १६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत त्या सासरी राहत होत्या. त्यांचे पती समीर तालिब सतत तलाक देण्याची धमकी देऊन मानसिक छळ करत आहेत.

पान १ वरुन

## विमानातील बेशुद्ध वृद्धासाठी अलिबागचे डॉ. साठ्ये ठरले देवदूत

एईडी आणि रक्तातील साखर तपासणी यंत्राचा वापर करून त्यांनी उपचार सुरू केले. प्रवाशाला रिकव्हरी पोझिशनमध्ये आणून ऑक्सिजन दिला आणि पाय उंचावले. काही वेळातच सकारात्मक परिणाम दिसला. ऑक्सिजन पातळी ९९ टक्क्यांपर्यंत वाढली. रक्तदाब १४०/८० झाला आणि १० मिनिटांत वृद्ध शुद्धीवर आले. मुंबईत उतरण्यापूर्वी पुन्हा ऑक्सिजन खालावला, त्वचा निळसर पडली. तेव्हा वैद्यकीय किटमधील औषधांनी त्यांचे प्राण वाचवले. मुंबई विमानतळावर प्रवाशाला वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करण्यात आले. डॉ. साठ्ये अमेरिका दौऱ्यावरून न्यूयॉर्कमार्गे पॅरिसला आले होते. पॅरिस–मुंबई कनेक्टिंग फ्लाइट चुकल्याने त्यांना एक दिवस पॅरिसमध्ये थांबावे लागले आणि दुसऱ्या दिवशी त्यांना विमानात तिकीट मिळाले. कदाचित त्या प्रवाशाच्या सेवेसाठीच माझे विमान चुकले असावे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

## महाड एमआयडीसीतील इफ्का कंपनीला टाळे लागल्याने कामगार चिंतेत

**महाड: प्रतिनिधी**

महाड औद्योगिक वसाहती मधील कारखान्यांना घरघर लागली असून गेल्या कांहीं वर्षांत कारखाने बंद पडत असतानाच आणखी एक कारखाना बंद पडला. महाड मधील इफ्का लॅबोरेटरीज कंपनीला कारखाना मालकाने टाळे ठोकले आहे. कोणतीही पुर्वसूचना न देता अचानक टाळे लावण्यात आले आहे यामुळे कामगारांमध्ये संताप व्यक्त होत आहे.



महाड औद्योगिक वसाहतीतील इफ्का लॅबोरेटरीज कंपनीतील कामगारांची २ आक्टोबर २०२६ रोजी बैठक घेऊन कंपनी वर्धा हिंगणी येथे स्थलांतर होत असून सर्व कामगारांना तेथे सामावून घेण्यात येईल असे सांगण्यात आले. या बैठकीला कंपनीचे कार्यालयीन व्यवस्थापक साईदत्त नंदा, अभिषेक घोलप, अँड. परांजपे तर कामगार उत्कर्ष सभेचे अध्यक्ष जितेंद्र जोशी व कैलास मोरे उपस्थित होते. या बैठकीत २०२१ च्या महापूरात झालेले नुकसान त्यानंतर प्रयत्न करूनही कंपनीची परिस्थिती सुधारली नसल्याने सर्व पर्याय संपल्याने कंपनी वर्धा हिंगणी येथे कंपनीचे सर्व कामगारांसह स्थलांतर केले जाईल. जे कामगार स्थलांतर होणार नाहीत त्यांचा हिशेब व ग्रॅज्युएटी देण्यात येईल असे सांगण्यात आले.

मात्र कंपनीला १४ आक्टोबरला रात्री टाळे ठोकणात येईल याबद्दल काहीच कल्पना न देता अचानक टाळे ठोकून व्यवस्थापनाने युनियनला १२ आक्टोबरला दिलेले पत्र प्रवेशद्वारावर लावून कामगारांची बोलवण केली आहे. अचानक उद्भवलेल्या या परिस्थितीमुळे कंपनीत कार्यरत कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह या रोजगारावर अवलंबून असल्याने त्यांच्या भवितव्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे.

कंपनी स्थलांतर करण्यास कामगारांचा कोणताच विरोध नसून गेली ३० ते ३५ वर्षे इमाने इतबारे काम करणाऱ्या व निवृत्तीजवळ आलेल्या कामगारांचा पुर्ण हिशेब करून स्थलांतरीत होणाऱ्या कामगारांचे वेतन वाढ करावी अशी मागणी कामगारांकडून होत आहे. मात्र कंपनी ला टाळे ठोकल्यानंतर व्यवस्थापनातील कोणताही अधिकारी कामगारांच्या संपर्कात नाही असा आरोप करत कामगारांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, न्याय मिळवण्यासाठी उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागला तरी मागे हटणार नाही, असा इशाराही कामगारांनी दिला आहे.

# तळोज्यात अनधिकृत बांधकामांवर सिडकोचा हातोडा

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा नोडमधील अनधिकृत व्यावसायिक अतिक्रमणांविरोधात सिडकोने धडक कारवाई केली आहे. सेक्टर १, ४, ३४ आणि ३६ मध्ये राबविण्यात आलेल्या या मोहिमेत हॉटेल्स, वॉशिंग सेंटर्स, चिकन व भाजीविक्रीची दुकाने, रसवंतीगृहे, कंटेनरमधील कार्यालये आणि अन्य व्यावसायिक अतिक्रमणे हटविण्यात आली. या कारवाईत सुमारे ८,७०० चौरस मीटर क्षेत्र अतिक्रमणमुक्त करण्यात आले असून, सुमारे २५ स्टॉल्स निष्कासित करण्यात आले.



तळोजा नोडमधील सिडकोच्या मालकीच्या भूखंडांवर अनेक व्यावसायिकांनी अनधिकृतपणे बांधकामे करून व्यवसाय सुरू केले होते. या अतिक्रमणांविरोधात सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने विशेष मोहीम राबविली.सेक्टर १ मध्ये सुमारे २०० चौरस मीटर जागेवर सुरू असलेले अनधिकृत हॉटेल आणि वॉशिंग सेंटर हटविण्यात आले. तसेच सेक्टर ४ मधील भूखंड क्रमांक २१ येथे सुमारे १,५०० चौरस मीटर जागेवरील चिकन व भाजीविक्रीची दुकाने, रसवंतीगृह, कंटेनरमधील कार्यालय आणि अन्य अतिक्रमणे हटविण्यात आली.

दरम्यान, सेक्टर ३४ आणि ३६ मधील दीपसागर व सुखसागर गृहसंकुलांसमोरील सुमारे ७,००० चौरस मीटर जागेवरही मोठ्या प्रमाणात व्यावसायिक अतिक्रमणे करण्यात आली होती. या ठिकाणची अनधिकृत दुकाने, वॉशिंग सेंटर्स, हॉटेल्स, भाजीविक्री केंद्रे आणि अन्य व्यावसायिक आस्थापने हटवून परिसर मोकळा करण्यात आला.

सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे आणि मुख्य नियंत्रक (अनधिकृत बांधकामे) विशाल ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली, नियंत्रक (अनधिकृत बांधकामे) पावसकर यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात आली. भूमापक वैभव काळे यांच्यासह सिडकोचे पोलीस पथक, स्थानिक पोलीस, सुरक्षा रक्षक आणि संबंधित कर्मचारी या कारवाईत सहभागी झाले होते.

तळोजा परिसरातील सिडकोच्या भूखंडांवरील अनधिकृत व्यावसायिक अतिक्रमणांविरोधातील या कारवाईमुळे संबंधित व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

# कामोठ्यात अनोळखी व्यक्तीचा मृतदेह; ओळख पटविण्याचे पोलिसांचे आवाहन

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे येथील जवाहर इंडस्ट्रीच्या कॅन्टीनजवळ एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला आहे. या व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी कामोठे पोलिसांनी नागरिकांना पुढे येण्याचे आवाहन केले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जवाहर इंडस्ट्रीच्या कॅन्टीनजवळ हा इसम मृतावस्थेत आढळला. त्याला पनवेल उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले असता डॉक्टरांनी तपासून दाखल करण्यापूर्वीच मृत घोषित केले. याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू नोंद करण्यात आली आहे.

मृत व्यक्तीचे वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे असून, शरीरयष्टी सडपातळ, उंची सुमारे १६७ सेंटीमीटर, चेहरा गोल, केस काळे आणि रंग निमगोरा आहे. मृताच्या अंगात फिकट गुलाबी रंगाचा शर्ट व पँट होती.

या व्यक्तीबाबत कोणाला माहिती असल्यास किंवा तिची ओळख पटत असल्यास कामोठे पोलीस ठाण्याशी ८६५५३५४११४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस उपनिरीक्षक गणेश इंगळे यांनी केले आहे.

## रिक्षा आणि बुलेटच्या अपघातात एक जण जखमी

**नवीन पनवेल :** रिक्षा आणि बुलेटच्या अपघातात एक जण जखमी झाल्याप्रकरणी बुलेट चालक प्रथमेश प्रकाश साळुंखे (राहणार कामोठे) यांच्या विरोधात १८ ऑक्टोबर रोजी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. १४ ऑक्टोबर रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास बेलपाडा मेट्रो स्टेशनच्या अलीकडे स्कायवॉक जवळ पनवेल लेनला उद्देश कासारे हे रिक्षा घेऊन जात होते. यावेळी बुलेटवरील चालक प्रथमेश याने रिक्षाला धडक दिली आणि त्या अपघातात रिक्षाचालक कासारे हे जखमी झाले.

# खारघर हिलच्या पायथ्याशी 'हुपू' आणि युरोपियन रोलरचे दर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर हिलच्या पायथ्याशी असलेल्या बेलपाडा मैदानावर शनिवारी दुर्मिळ पक्षीप्रेमींसाठी एक नयनरम्य दृश्य पाहायला मिळाले. युरोपियन रोलर आणि आकर्षक तुरा असलेला हुदहुद पक्षी अर्थात 'हुपू' यांचा थवा कीटक आणि कृमी टिपण्यासाठी थेट मैदानाच्या हिरवळीवर उतरला होता.





खारघर हिल हे नेहमीच दुर्मिळ पक्ष्यांचे अधिवासाचे ठिकाण म्हणून ओळखले जाते. हिलवरील पक्षी अनेकदा अन्नाच्या शोधात पायथ्याशी असलेल्या मोकळ्या मैदानांवर आणि खाडी परिसरात येतात. याचाच एक भाग म्हणून हा थवा बेलपाडा मैदानावर आला होता. हा दुर्मिळ क्षण खारघर ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच आणि पक्षीप्रेमी संजय घरत यांनी आपल्या कॅमेऱ्यात कैद केला.मैदानावरील हिरव्यागार गवतात हे पक्षी आपली लांब, बाकदार चोच जमिनीत खुपसून कीटक शोधण्यात पूर्णपणे मग्न झाले होते. त्याच वेळी मैदानावर सराव करणाऱ्या बाल खेळाडूंना आणि स्थानिक नागरिकांना अगदी जवळून या सौंदर्यपूर्ण पक्षांचे निरीक्षण करता आले. डोक्यावरील पंखांचा वैशिष्ट्यपूर्ण तुरा आणि पंखावरील काळ्या-पांढऱ्या पट्ट्यांमुळे हुपू पक्ष्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

सामान्यतः झाडांच्या खोडावर चोचीने प्रहार करणारा सुतार पक्षी आणि हुपू पक्षी दिसण्यात काहीसा सारखा वाटतो असे घरत यांचे म्हणणे आहे.त्यामुळे अनेक खेळाडूंना सुरुवातीला तो सुतार पक्षी असल्याचे वाटले. मात्र त्याच्या डोक्यावरील तुऱ्यामुळे तो हुपू असल्याचे स्पष्ट झाले."

हिवाळ्याच्या सुरुवातीला खारघर खाडी, खारघर हिल आणि पांडवकडा परिसरात विविध प्रजातींचे स्थलांतरित पक्षी येत असतात. पुढील चार महिने पक्षीप्रेमींसाठी ही पर्वणी असते. बेलपाडा मैदानासारख्या मानवी वर्दळीच्या ठिकाणी अशा दुर्मिळ पक्ष्यांचे आगमन हे येथील निसर्ग अजूनही समृद्ध असल्याचे लक्षण असल्याचे पक्षीप्रेमींनी सांगितले.

# पत्रकार उत्कर्ष समितीतर्फे उरणमध्ये नवदुर्गा सन्मान सोहळा उत्साहात

**उरण : बातमीदार**

उरण पत्रकार उत्कर्ष समिती आणि महिला उत्कर्ष समिती यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्र उत्सव सोहळ्याचे औचित्य साधून नवदुर्गा सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात समाजसेवा, मनोरंजन, प्रबोधन, आदर्श शिक्षिका, पत्रकारिता, कला, क्रीडा आणि वैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान मुली आणि महिलांचा सन्मान करण्यात आला. हा कार्यक्रम उरण मधील नगराज शेठ सीबीएसई स्कूल मध्ये संपन्न झाला.

पत्रकार उत्कर्ष समितीचे अध्यक्ष डॉ. अशोक म्हात्रे यांच्या अध्यक्षते खाली संपन्न झालेल्या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर बाबासो कालेल, सिनेअभिनेत्री दीपिका पाटील, नगराजशेठ सीबीएसई स्कूलचे व्यवस्थापक तथा जेष्ठ पत्रकार प्रदीप पाटील, स्कूलच्या प्रिन्सिपॉल ज्योती म्हात्रे मॅडम, आणि सोहळ्या साठी निमंत्रित नवदुर्गा आणि



त्यांचा परिवारांतील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर बाबासो कालेल यांनी सोहळ्या साठी उपस्थित नवदुर्गांना नवरात्री उत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा देऊन आपले मार्गदर्शन पर विचार मांडताना सांगितले की, आपल्या घरची गृहिणी हीच खरी नवदुर्गा असते तिची अनेक रूपे आपल्याला घरातच दर्शन देत असतात ज्या घरांतील गृहिणी साक्षर, व्यवहारदक्ष, आणि निरोगी असते ती आपल्या घरांतील प्रत्येक सदस्याला पुढे घेऊन जाते त्यामुळे प्रत्येक महिला ही आरोग्य संपन्न असणे काळाची गरज असल्याचे सांगून ते पुढे म्हणाले प्रत्येक महिलेने प्रथम स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे, महिलांचे प्रमुख आजार नेमके कोणते हे सविस्तरपणे सांगून त्या संदर्भात घ्यावयाची काळजी आणि त्यावरील उपचार याबाबत सविस्तर मार्गदर्शन करून उपस्थित महिलांमध्ये जनजागृती केली.

मान्यवरांच्या हस्ते समाजसेवा, शैक्षणिक, आरोग्य, पोलीस, पत्रकारिता, क्रीडा आणि रिक्शा चालक, एस.टी, बस वाहक व इतर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा नव दुर्गाचा गौरव करण्यात आला.

## निवडक

### कारचा अपहार

**पनवेल :** वापरण्यासाठी घेतलेली सुमारे साडेचार लाख रुपये किमतीची ब्रेझा कार परत न करता तिचा अपहार केल्याप्रकरणी तिघांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणी दत्ता सुरेश क्षीरसागर, रुपेश शेळके आणि प्रेम राणा यांच्याविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला.या तिघांनी संगनमत करून घणसोली येथील फिर्यादी जयंत अभिमन्यू गायकवाड यांची ब्रेझा कार वापरण्यासाठी घेतली होती. मात्र, कार परत न करता तिचा अपहार केल्याचा आरोप आहे.याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### पादचाऱ्याचा अपघातात मृत्यू

**नवीन पनवेल :** वेगाने आलेल्या वाहनाने पादचाऱ्याला दिलेल्या धडकेत त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालका विरोधात १९ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सकाळी साडेसहाच्या सुमारास मुंबई पुणे एक्सप्रेस हायवेवर पुणे कडे जाणाऱ्या लेनवर ३५ ते ४० वर्षीय अनोळखी ईसम रस्त्यावर चालत होता. यावेळी भरधाव वेगाने आलेल्या वाहनाने त्याला जोरात धडक दिली आणि त्यात तो गंभीर जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला.

### ९३ हजारांचा अपहार

**नवीन पनवेल :** मसाल्याच्या ऑर्डर मधून मिळालेल्या ९३ हजार रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी कृष्णकुमार जयस्वाल (राहणार नवीन पनवेल सेक्टर सात) याच्या विरोधात खानदेश वर बूट घातली श्वर पोलीस ठाण्यात १९ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. गोपाळ रामचंद्र पाटील हे खांदा कॉलनी येथे राहत असून ते एवरेस्ट मसाल्याचे डीलर आहेत. आरोपी कृष्णकुमार हा डिलिव्हरी बॉय म्हणून त्यांच्याकडे काम करतो. त्याने मसाल्याची डिलिव्हरी करून प्राप्त झालेले ९३ हजार रुपये हे स्वतःच्या फायद्यासाठी वापरले आणि तो कुठेतरी निघून गेला.

### रूम न देता केली फसवणूक

**नवीन पनवेल :** फिर्यादी यांच्याकडून ११ लाख २९ हजार रुपये स्वीकारून रूम न दिल्या प्रकरणी रामनरेश चव्हाण (सेक्टर १५ नवीन पनवेल, ओमकार आर्केड) यांच्या विरोधात १९ ऑक्टोबर रोजी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अमित चंद्रकांत पाटील हे सुवर्णभूमी कॉम्प्लेक्स सुकापुर येथे राहत असून त्यांना विचुंबे येथील शिवशक्ती रेसिडेन्सी इमारतीमधील सदनिका रामनरेश चव्हाण यांनी विक्री केली. व्यवहारापोटी पनवेल येथील दुय्यम निबंधक कार्यालयात विक्री खताची नोंदणी करून त्यांच्याकडून ११ लाख २९ हजार रुपये घेतले. या सदनिकेचा त्यांना ताबा न देता अन्य व्यक्तीला त्यात ठेवून पाटील यांची फसवणूक केली.

# कोमसापचे सारडे गावात कविसंमेलन

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील सारडे या गावी कोकण मराठी साहित्य परिषद (कोमसाप )उरण शाखेचे बहारदार कविसंमेलन झाले. भेंडखळ गावच्या उपसरपंच संगीता मेघश्याम भगत या कार्यक्रमाच्या अध्यक्ष होत्या.प्रमुख अतिथी म्हणून साहित्यरत्न रायगडभूषण प्रा. एल बी पाटील, शाखाध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे,के.एस.पाटील,सुनंदा पाटील आदी मान्यवर होती.



प्रास्ताविक गंधार पाटील यांनी नवरात्रीमधील दुर्गामातेचे महत्त्व स्पष्ट करून समाजातील आजच्या महिषासुर अधिक घातक आहेत,सांगून आयोजक सारड्याच्या पाटील कुटुंबीयांचे अभिनंदन केले.

म.का.म्हात्रे यांच्या सुरेख सूत्रसंचालनात बहारदार कविसंमेलन रंगले.बालकवी अनुज शिवकर,अभ्यासू कवी केशव म्हात्रे,रांगड्या आवाजाचे शाहीर अनंत पाटील,अजय शिवकर, मच्छिंद्र म्हात्रे,साहित्यरत्न रायगडभूषण प्रा एल बी पाटील यांनी आगरी ढंगात कविता सादर करून वातावरण हलकेफुलके केले. जे एस पाटील, एम, एस पाटील,सुनील पाटील,हरिश्चंद्र पाटील आणि पाटील कुटुंबीयांनी अतिशय सुरेख नियोजन केले.सुनील केशव यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# वारकरी संप्रदायाच्या प्रचार-प्रसारासाठी एक लाख हरिपाठ पुस्तकांचे वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वारकरी संप्रदायाची परंपरा जपण्यासाठी, संतांचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि तरुण पिढीमध्ये अध्यात्मिक संस्कार रुजवण्यासाठी युवासेनेच्या वतीने एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला आहे. युवासेना उत्तर रायगडच्या पुढाकारातून तब्बल एक लाख हरिपाठ पुस्तकांचे वाटप करण्याचा संकल्प हाती घेण्यात आला आहे.

महाराष्ट्राला संतांची आणि वारकरी परंपरेची समृद्ध परंपरा लाभली आहे. संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज यांच्यासह अनेक संतांनी आपल्या अभंग आणि कीर्तनांच्या माध्यमातून समाजाला भक्ती, समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश दिला. हरिपाठाच्या माध्यमातून हे विचार प्रत्येक घरापर्यंत पोहोचावेत, तसेच तरुणांमध्ये वारकरी संप्रदायाविषयी श्रद्धा आणि आवड निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

एक लाख हरिपाठ पुस्तकांच्या वाटपाचा हा उपक्रम म्हणजे केवळ पुस्तकांचे वितरण नसून संतविचारांचा आणि अध्यात्मिक संस्कारांचा प्रसार करण्याचा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे. या माध्यमातून वारकरी संप्रदायाची परंपरा अधिक व्यापक होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

सामाजिक कार्यासोबतच अध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा जपण्याच्या या प्रयत्नामुळे युवासेनेच्या कार्याला एक नवी दिशा मिळत असून, समाजातील विविध स्तरांतून या उपक्रमाचे स्वागत होत आहे.

संतविचारांचा जागर, हरिनामाचा गजर आणि वारकरी परंपरेचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प आहे.

# सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालयात दांडिया रास

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात दि.१९ ऑक्टो रोजी सांस्कृतिक समितीच्या वतीने शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त दांडिया रासचे आयोजन करण्यात आले होते .

सदर कार्यक्रमास मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास म्हात्रे, उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर,इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे,पर्यवेक्षक अजित सोनवणे ,पर्यवेक्षक हरिश्चंद्र ठाकूर, पर्यवेक्षिका स्वाती पाटील तसेच विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. विज्ञान विभागातर्फे सहाय्यक शिक्षिका प्रतिमा पडवळ व ऋतुजा शेंडे



तर कला व वाणिज्य विभागातर्फे मिलिंद सुरवाडे,उजमा कच्छी व हर्षदा लोखंडे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

दांडियारास मध्ये मुलींमधून प्रियल चौरसिया(११ वी सायन्स) व शरयू भोईर (११ वी आर्ट्स )या दोघींची 'दांडिया क्वीन' तर मुलांमधून शुभम होतकर (११वी सायन्स) व प्रणव हाटे ( ११ वी कॉमर्स) या विद्यार्थ्यांची 'दांडिया किंग ' म्हणून निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. सुमधुर संगीताच्या तालावर सर्व विद्यार्थ्यांनी सुंदर दांडियारासचे सादरीकरण केले.अतिशय उत्साहपूर्ण, आनंदाच्या वातावरणात सर्व विद्यार्थ्यांनी या दांडियारास कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला.सर्व शिक्षकांच्या उपस्थितीत तसेच सर्वांच्या सहकार्याने सांस्कृतिक समिती तर्फे कार्यक्रमाचे सुंदर आयोजन झाले.

# पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** लिव इन मध्ये राहत असलेल्या महिलेच्या मुली सोबत विनयभंग केल्याप्रकरणी आरोपी अजित नारप्पा रेड्डी (राहणार आंध्र प्रदेश) याच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात १९ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी अजित हा ४३ वर्षीय फिर्यादी सोबत लिवईन रिलेशन मध्ये राहत होता. यावेळी फिर्यादी यांच्याकडून ४९ लाख ७३ हजार रुपये घेतले आणि फिर्यादीच्या मुलीसमोर शरीरसंबंध करून त्यांना मारहाण केली तसेच त्यांच्या मुलीला एका दिवसासाठी बाहेर घेऊन गेला आणि फिर्यादी घरी नसताना आरोपीने त्यांच्या मुलीला मोबाईलवर अश्लील व्हिडिओ दाखवले आणि तिचा विनयभंग केला तसेच फिर्यादी आणि त्यांच्या मुलीला शिवीगाळ व मारहाण केली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# अपघातात इसमाचा मृत्यू

**नवीन पनवेल :** मोटरसायकलला अन्य वाहनाने दिलेल्या धडकेत पनवेल शहरातील किनारा सोसायटी बावन बंगला येथील हरीश मदन वावा यांचा मृत्यू झाला. या अपघाता प्रकरणी १९ ऑक्टोबर रोजी अज्ञात वाहन चालका विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला हरीश मदन वावा हे त्यांच्या होंडा शाईन मोटरसायकल क्रमांक एम एच ४६ बीवाय ६२१४ वरून उरण जेएनपीटी ते पनवेल रस्त्यावर कुंडेवहाळ गावाकडे जाणाऱ्या कट जवळ जात असताना त्यांच्या मोटरसायकलला अज्ञात वाहनाने धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी झाले आणि त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर अज्ञात वाहन चालक पळून गेला पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

## संपादकीय

# भीतीचे राजकारण नको

अभिनेता टायगर श्रॉफवरील गोळीबारानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्या घटनेची घेतलेली तातडीची दखल आणि तपासासाठी मुंबई पोलिसांनी दाखवलेली लक्षणीय तत्परता यांचे कौतुक करण्याऐवजी त्या घटनेचे राजकीय भांडवल करून राज्यातील कायदा–सुव्यवस्थेबाबत भीतीचे वातावरण निर्माण करणे कितपत योग्य आहे? महाराष्ट्राला भीतीचे राजकारण नको, तर कायद्याचे राज्य आणि सुरक्षिततेचा ठाम विश्वास हवा आहे.

**बॉलिवुड अभिनेता टायगर श्रॉफ याच्यावर मुंबईतील जुहू परिसरात झालेल्या गोळीबाराच्या घटनेने साहजिकच चिंता निर्माण झाली. मुंबईसारख्या देशाची आर्थिक राजधानी असलेल्या महानगरात गुन्हेगारांनी अशा प्रकारे भर वर्दळीच्या ठिकाणी बंदुकीचा वापर करून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणे ही निश्चितच गंभीर बाब आहे. या घटनेत टायगर श्रॉफ बचावला, मात्र त्याचा वाहनचालक आणि एक पादचारी जखमी झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाच्या तपासाला गती देण्याचे निर्देश देतानाच या गुन्ह्यातील आरोपींना शोधून काढून कायद्याच्या कचाट्यात आणले जाईल अशी ग्वाही दिली. त्यानुसार २४ तासांत राजस्थानमधील कोटा येथून राजस्थान पोलिसांच्या मदतीने मुंबई गुन्हे शाखेने सोमवारी तिघा संशयित हल्लेखोरांना अटक केली. आंतरराज्यीय समन्वय, तांत्रिक तपास आणि पोलिसांची सक्रियता यांचे महत्त्व अधोरेखित करणारे हे पाऊल आहे. अर्थात, या गुन्ह्यामागील संपूर्ण कट, त्याचे सूत्रधार आणि संघटित गुन्हेगारीशी असलेले त्यांचे संभाव्य संबंध उघड करून दोषींना न्यायालयात शिक्षा होईल याची खात्री करणेही तितकेच आवश्यक आहे. मात्र, विरोधकांनी, विशेषतः उद्धव ठाकरे यांच्यासारख्यांनी अशा एखाद्या घटनेकडे पाहताना संयम आणि जबाबदारी दाखवणे अपेक्षित आहे. एखादी गंभीर गुन्हेगारी घटना घडली म्हणजे संपूर्ण राज्यातील कायदा–सुव्यवस्था कोलमडली असा निष्कर्ष काढता येत नाही. सरकारला प्रश्न विचारणे हा विरोधकांचा अधिकार आहे. परंतु तपास पूर्ण होण्यापूर्वीच भीतीचे वातावरण निर्माण करणे म्हणजे जनतेच्या चिंतेचा राजकीय लाभ उठवण्याचा प्रयत्न ठरू शकतो. बॉलिवुडमधील एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीवर अशा प्रकारे हल्ला होण्याची ही काही पहिली वेळ नाही. मुंबईने यापूर्वी ऐंशी आणि नव्वदच्या दशकांत भीषण टोळीयुद्धांचा काळ अनुभवला आहे. खंडणी, गोळीबार आणि संघटित गुन्हेगारीने त्या काळात उद्योगजगतापासून चित्रपटसृष्टीपर्यंत अनेक क्षेत्रांना धास्तावले होते. टायगर श्रॉफवरील गोळीबाराच्या घटनेचे गांभीर्य नाकारता येणार नाही. पण मुंबई पोलिसांनी काही वर्षांपूर्वी गुन्हेगारी टोळ्यांविरुद्ध केलेल्या संघर्षाचाही विसर पडू नये. उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळातही अनेक प्रकरणांच्या तपासावरून वाद निर्माण झाला. अभिनेता सुशांतसिंह राजपूतचा मृत्यू व दिशा सालियन मृत्यूप्रकरण यांमुळे तपासाच्या पद्धती, पारदर्शकता व प्रशासनाच्या भूमिकेबाबत सार्वजनिक चर्चा झाली. आता दिशाच्या मृत्यूप्रकरणाचा नव्याने तपास सुरू असून सत्य समोर येईल. कुठल्याही सरकारला सर्व गुन्हे रोखल्याचा दावा करता येणार नाही. त्यामुळेच महाराष्ट्राला राजकीय आरोप–प्रत्यारोपांपेक्षा सक्षम पोलिस यंत्रणा, कायद्याची कठोर अंमलबजावणी व नागरिकांच्या सुरक्षिततेची खात्री देणारे प्रशासन आवश्यक आहे. फडणवीस सरकार टायगर श्रॉफ गोळीबार प्रकरणाचा तपास तडीस नेऊन गुन्हेगारांना नक्कीच शिक्षा मिळवून देईल. तोवर विरोधकांनीही तथ्यांच्या आधारे सरकारला जाब विचारावा. अतिरंजित आरोपांनी जनतेत असुरक्षिततेची भावना वाढवू नये. गुन्हेगारांविरुद्ध कठोर कारवाई ही सरकारची जबाबदारी आहे, परंतु प्रत्येक गुन्ह्याचे राजकीय संकटात रूपांतर करणे ही विरोधकांची जबाबदारी नव्हे.**

# सर्वदूर ऑक्टोबर हीटचा असह्य तडाखा



ऑक्टोबर महिना म्हटला की अनेकांच्या मनात सणासुदीचे वातावरण येते, पण या उत्सवाच्या काळात हवामानाचा एक वेगळाच अनुभव येतो, त्याला ऑक्टोबर हीट असे म्हणतात. मान्सूननंतर येणारी गरमी अनपेक्षित वाटते, कारण थंडी अपेक्षित असते. मान्सून जून ते सप्टेंबर या काळात सक्रिय असतो. या काळात आकाश ढगाळ असते, पाऊस पडतो आणि हवेतील आर्द्रता जास्त असते. सप्टेंबरच्या शेवटी मान्सून परतीच्या प्रवासाला लागतो. आकाश निरभ्र होते, पावसाचे प्रमाण कमी होते आणि सूर्यप्रकाश थेट जमिनीवर येतो. या काळात तापमान वाढते. हवेत अजूनही आर्द्रता शिल्लक असते, त्यामुळे उकाडा जास्त जाणवतो.

हवामानशास्त्रात यालाच ऑक्टोबर हीट म्हणतात. ही स्थिती साधारणपणे ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवड्यापासून ते महिन्याच्या शेवटपर्यंत जाणवते. काही वर्षी ती नोव्हेंबरच्या सुरुवातीपर्यंतही टिकते. पावसाळ्यात सूर्याची ऊर्जा पाण्याचे बाष्पीभवन करण्यात वापरली जाते. जमीन फारशी तापत नाही. मान्सून गेल्यानंतर ही ऊर्जा थेट जमीन तापवण्यासाठी वापरली जाते. जमिनीचे तापमान वाढते आणि त्यातून उष्णता हवेत पसरते. दुसरे कारण म्हणजे वाऱ्याची दिशा बदलणे. मान्सूनमध्ये समुद्राकडून जमिनीकडे वारे वाहतात. ऑक्टोबरमध्ये वाऱ्याची दिशा बदलते आणि कोरडे वारे वाहू लागतात. आकाश स्वच्छ असल्यामुळे दिवसा तापमान झपाट्याने वाढते. रात्री मात्र थोडीशी थंडी जाणवते, कारण ढग नसल्यामुळे उष्णता टिकून राहत नाही. त्यामुळे दिवस आणि रात्रीच्या तापमानात मोठा फरक दिसतो. ऑक्टोबर हीटचे वैशिष्ट्य म्हणजे फक्त तापमान नव्हे, तर उकाडा. पावसाळ्यात जमिनीत आणि हवेत भरपूर ओलावा असतो. ऑक्टोबरमध्ये तो ओलावा अजूनही कमी झालेला नसतो. उच्च तापमान आणि उच्च आर्द्रता एकत्र आल्यावर शरीरातून घामाचे बाष्पीभवन नीट होत नाही.

त्यामुळे अस्वस्थता वाढते. पंख्याखाली बसले तरी गरम वाटते. हा ऑक्टोबरचा त्रासदायक उकाडा, या काळात शरीराला नवीन हवामानाशी जुळवून घ्यावे लागते. पावसाळ्यातील थंड आणि दमट हवामानानंतर अचानक येणारी कोरडी गरमी शरीरासाठी आव्हानात्मक असते. घाम जास्त येतो, पाणी कमी प्यायल्यास थकवा येतो. त्वचा कोरडी पडण्याची शक्यता असते. डोकेदुखी, अस्वस्थता, झोप न लागणे अशा तक्रारी काही लोकांमध्ये दिसतात. लहान मुले आणि वयस्कर व्यक्तींना याचा त्रास जास्त जाणवू शकतो. म्हणून या काळात स्वतःची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. ऑक्टोबर हीटमध्ये निरोगी राहण्यासाठी काही सोप्या सवयी उपयुक्त ठरतात.

पाणी भरपूर प्यावे. दिवसभरात नियमित अंतराने पाणी पिणे गरजेचे आहे. तहान लागण्याची वाट पाहू नये. नारळ पाणी, लिंबू पाणी, ताक, कोकम सरबत यांसारखी नैसर्गिक पेये शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवतात आणि देतात. आहार हलका आणि पचायला सोपा ठेवावा. ताज्या भाज्या, फळे, कोशिंबिरी, काकडी, टरबूज यांचा समावेश करावा. जास्त तेलकट आणि मसालेदार पदार्थ टाळलेले बरे. दुपारच्या वेळी जड जेवण टाळून संध्याकाळी हलके जेवण घ्यावे. कपड्यांची निवड महत्त्वाची आहे. सुती, सैल आणि हलक्या रंगाचे कपडे वापरावेत. त्यामुळे शरीराला हवा लागते आणि उष्णता कमी जाणवते. घराबाहेर पडताना टोपी, छत्री आणि गॉगलचा वापर करावा. दुपारी बारा ते चार या वेळेत उन्हात जास्त वेळ राहणे टाळावे. कामानिमित्त बाहेर जावे लागत असल्यास सावलीतून जाण्याचा प्रयत्न करावा. घरात हवा खेळती ठेवावी.

सकाळी आणि संध्याकाळी खिडक्या उघड्या ठेवल्याने घर थंड राहते. दुपारी पडदे लावल्यास ऊन आत येत नाही. ऑक्टोबरमध्ये घर थंड ठेवण्यासाठी काही पारंपरिक उपाय आजही प्रभावी आहेत. दुपारी पडदे लावून ठेवणे, फरशीवर थोडे पाणी शिंपडणे, तुळशी आणि इतर रोपे अंगणात लावणे यामुळे घरातील तापमान कमी राहते. सकाळी लवकर उठून कामे पूर्ण केल्यास उन्हाचा त्रास कमी होतो. शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा काळ महत्त्वाचा असतो. खरीप पिकांची कापणी संपते आणि रब्बी पिकांची तयारी सुरू होते. जमिनीतील ओलावा या काळात पिकांसाठी उपयुक्त ठरतो. सकाळच्या वेळी पडणारे दव पिकांना पोषक असते. शेतात काम करताना सकाळची वेळ निवडणे चांगले. विशेष म्हणजे आपले सण या हवामानाशी जुळवून घेतलेले दिसतात.

दिवाळीत घराची साफसफाई, रंगरंगोटी होते, ज्यामुळे घर अधिक हवेशीर बनते. दिवाळीतील दिव्यांचा उजेड आणि आकाशातील निरभ्र चंद्रमा ऑक्टोबरच्या स्वच्छ आकाशामुळेच अधिक खुलून दिसतो. सणांचा आनंद या हवामानात वेगळाच असतो. ऑक्टोबर हीट हा काही नवीन प्रकार नाही. आपल्या पूर्वजांनीही याचा अनुभव घेतला आहे. त्यांनी आपली जीवनशैली, घरांची रचना, कपडे आणि आहार या हवामानाला अनुसरून तयार केले होते. कौलारू घरे, अंगणातील झाडे, दुपारची वामकुक्षी या सगळ्या सवयी या उष्णतेला तोंड देण्यासाठीच विकसित झाल्या. आजही या सवयी उपयुक्त आहेत. निसर्गात प्रत्येक ऋतूचे स्वतःचे महत्त्व असते. पावसाळा जीवन देतो, हिवाळा विश्रांती देतो आणि उन्हाळा ऊर्जा देतो.

ऑक्टोबर हीट हा पावसाळा आणि हिवाळा यामधील संधिकाल आहे. हा काळ आपल्याला बदल स्वीकारायला शिकवतो. हळूहळू थंडीच्या आगमनाची चाहूल या उकाड्यानंतरच लागते. सकाळी धुके, संध्याकाळी थंड वारा आणि रात्री गुलाबी थंडी हळूहळू वाढत जाते. हा बदल हळूहळू होतो. या काळात संध्याकाळ सुंदर असते. आकाश निरभ्र असल्यामुळे सूर्यास्ताचे रंग अधिक गडद दिसतात. रात्री तारे स्पष्ट दिसतात. ही वेळ फिरण्यासाठी, कुटुंबासोबत वेळ घालवण्यासाठी चांगली असते. टेरेसवर बसून गप्पा मारणे, थंड पेय पिणे यात वेगळीच मजा आहे. या दिवसांत सकाळी लवकर फिरायला जाणे खूप प्रसन्न वाटते. हलका व्यायाम, प्राणायाम आणि योग केल्यास शरीर ताजेतवाने राहते. मनही शांत होते आणि दिवस उत्साहात सुरू होतो. शेवटी ऑक्टोबर हीट हा निसर्गाचा एक भाग आहे.

त्याला घाबरण्याऐवजी समजून घेऊन त्यानुसार आपल्या सवयींमध्ये छोटे बदल केल्यास हा काळही आनंददायी होऊ शकतो. पावसाळ्यातील आर्द्रतेनंतर येणारी ही गरमी क्षणिक आहे, ती लवकरच संपून हिवाळ्याची चाहूल सुरू होते आणि वातावरण आल्हाददायक बनते. पुरेसे पाणी, योग्य आहार, योग्य कपडे आणि सकारात्मक दृष्टिकोन यामुळे आपण या हंगामाचा आनंद घेऊ शकतो. सणांचा उत्साह आणि निसर्गाची ही छोटीशी परीक्षा दोन्ही एकत्र येतात आणि जीवन अधिक रंगतदार बनते. निसर्गाच्या या चक्रात प्रत्येक दिवसाचे स्वतःचे सौंदर्य आहे, ते अनुभवणे हेच खरे शहाणपण आहे.

(साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# जीमेलचा पासवर्ड विसरला? 'या' ट्रिकने पुन्हा मिळवा

आजच्या डिजिटल युगात जीमेल हा आपल्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. Google Drive, Google Photos आणि YouTube सारख्या अनेक महत्त्वाच्या प्सवर ईमेल पाठवण्यापासून ते फक्त Gmail खात्याद्वारेच ॲक्सेस उपलब्ध आहे. पण तुम्ही तुमचा जीमेल पासवर्ड विसरला असाल तर घाबरण्याची गरज नाही. काही सोप्या स्टेप्स फॉलो करून तुम्ही तुमच्या Gmail अकाउंटमध्ये काही मिनिटांत पुन्हा प्रवेश करू शकता.तुम्ही तुमचा Gmail पासवर्ड विसरला असल्यास, तो रीसेट करण्यासाठीपासवर्ड रिकव्हरी पेजवर जा. सर्व प्रथम आपल्या ब्राउझरमध्ये Google Account Recovery Page उघडा. येथे तुम्हाला तुमचा Gmail ॲड्रेस टाकावा लागेल आणि Next बटणावर क्लिक करावे लागेल.



जुन्या पासवर्डने व्हेरिफाय करा : Google प्रथम तुम्हाला तुमचा पूर्वीचा पासवर्ड विचारेल. आपल्याला आठवत असल्यास, तो टाका आणि छ्शीं क्लिक करा. तुम्हाला जुना पासवर्ड आठवत नसेल, तर Try another way हा पर्याय निवडा.

OTPसह खाते व्हेरिफाय करा Google तुमच्या खात्याशी लिंक केलेल्या मोबाइल नंबरवर OTP (वन-टाइम पासवर्ड) पाठवेल. मोबाईल नंबरवर प्राप्त झालेला OTP एंटर करा आणि Next बटण दाबा.

**बॅकअप ई-मेल किंवा सुरक्षा प्रश्न**

तुम्हाला तुमच्या मोबाईल नंबरवर Google तुमच्या बॅकअप ई-मेलवर पडताळणी लिंक पाठवू शकते. काही प्रकरणांमध्ये तुम्हाला सुरक्षा प्रश्नांची उत्तरे देण्याचा पर्यायदेखील मिळू शकतो.

**नवीन पासवर्ड सेट करा**

पडताळणी केल्यानंतर, तुम्हाला नवीन पासवर्ड तयार करण्याचा पर्याय मिळेल. एक नवीन पासवर्ड निवडा जो मजबूत असेल आणि जो तुम्ही सहज लक्षात ठेवू शकता. पुष्टी करा बटणावर क्लिक केल्यानंतर तुमचा पासवर्ड रीसेट केला जाईल. पासवर्ड लक्षात राहण्यासाठी तुमचा पासवर्ड नोटबुकमध्ये लिहून सुरक्षित ठेवा. वेळोवेळी तो बदलत राहा.

# गायक, संगीतकार राम फाटक

रामचंद्र कृष्णाजी फाटक ऊर्फ राम फाटक हे मराठी गायक, संगीतकार होते. आज त्यांचा जन्मदिन (२१ ऑक्टोबर १९१७) आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून.

रामभाऊंचे क्रमिक विद्याशिक्षण चालू असतानाच त्यांनी पुण्यात राहून ग्वाल्हेर गायकीचे धडे घेतले. बालगंधर्वांनी नाटक कंपनीत येण्याचे निमंत्रण देऊनही शिक्षणाच्या कारणासाठी त्यांनी नकार दिला. नोकरी करत असतानाही त्यांची संगीताची ओढ कमी झाली नव्हती. १९४५मध्ये एचएमव्हीने त्यांची पहिली ध्वनिमुद्रिका प्रकाशित केली आणि रामभाऊंना आपले सुखनिधान सापडले.

शिक्षणाने एम.ए., बी.टी. असलेल्या राम फाटकांनी काही वर्षे शिक्षकी पेशा पत्करला. पुढे इ.स. १९५६पासून पुढील १० वर्षे नागपूर आकाशवाणी केंद्रावर तर त्यापुढील १० वर्षे पुणे आकाशवाणीवर त्यांनी नोकरी केली. इथेच भास्करराव गोडबोले आणि जे.एल. रानडे ह्यांसारख्यांचे मार्गदर्शन त्यांना मिळाले. पुणे आकाशवाणी केंद्रावर असतानाच ज्येष्ठ गायक आणि संगीतकार सुधीर फडके ह्यांच्याशी त्यांचा स्नेह जुळला. सुधीर फडक्यांच्या गीतरामायणामधील काही गाणी ते गायले. आकाशवाणीच्या पुणे केंद्रासाठी त्यांनी



**निमित्त**

शास्त्रीय संगीत गायिका बेगम परवीन सुलताना यांच्याकडून काही मराठी भावगीते गाऊन घेतली.

इ.स. १९७२ साली त्यावेळचे नवोदित गीतकार सुधीर मोघे ह्यांच्या 'सखी मंद झाल्या तारका' ह्या गीताला राम फाटकांनी स्वरबद्ध करून भीमसेन जोशी ह्यांच्याकडून हे गाणे गाऊन घेतले. पुढे हे गाणे ध्वनीफितीद्वारे सुधीर फडक्यांच्या स्वरात प्रकाशित करण्यात आले.

रामभाऊंनी 'संतवाणी'मधील 'तीर्थ विठ्ठल', 'माझे माहेर पंढरी', 'पंढरी निवासा', 'अणुरेणीया थोकडा' हे पंडित भीमसेन जोशींकडून गाऊन घेतलेले अभंग खूपच लोकप्रिय झाले. ह्याबरोबरच 'दिसलीस तू', 'डाव भांडून मांडून मोडू नको' आणि 'सखी, मंद झाल्या तारका' ही सुधीर फडक्यांनी गायलेली भावगीते प्रचंड गाजली. रामभाऊ फाटक यांनी 'स्वरयात्रा' या नावाचे आत्मचरित्र लिहिले आहे.

**राम फाटक यांचे संगीत असलेली काही गाणी**

अणुरेणिया थोकडा, अंतरीच्या गूढ गर्भी, अधिक देखणें तरी, अबीर गुलाल उधळीत, आता कोठे धावे मन, आम्हां नकळे ज्ञान, आरंभी वंदीन अयोध्येचा, ऊर्मिले त्रिवार वंदन तुला, काया ही पंढरी आत्मा, घडी घडी घडी चरण तुझे, जातां पंढरीस सुख वाटे, ज्याचा सखा हरी, झुंजता रणभूवरी तू, डाव मांडून भांडून, तपत्या झळा उन्हाच्या, तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल, दिसलीस तू फुलले ऋतू, नामाचा गजर गर्जे, पावलों पंढरी वैकुंठभुवन, पुण्य परउपकार पाप ते, पंढरी निवासा सख्या, पंढरीचे सुख नाहीं, पांडुरंग त्राता पांडुरंग दाता, मन लोभले मनमोहने, माझा भाव तुझे चरणी, माझे माहेर पंढरी, रसिका तुझ्याचसाठी, राम नाम ज्याचें मुखी, रामाचें भजन तेंचि, विठ्ठल गीतीं गावा, सखी मंद झाल्या तारका, सगुणाची सेज निर्गुणाची, सुखाचें हें नाम आवडीनें, संतभार पंढरीत, हे नायका जगदीश्वरा, ज्ञानियांचा राजा.

(साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# सकाळी उठल्यावर होणाऱ्या सांधेदुखीपासून बचावाचे उपाय

सकाळी उठल्यावर गुडघे दुखतात, हात वळवताना हाडांचा आवाज येतो, किंवा जिने चढताना पाय कडक होतात? असं काही होत असेल, तर हे दुर्लक्षित करू नका. हेच आर्थ्रायटिसचे सुरुवातीचे लक्षण असू शकतं.

आज, १२ ऑक्टोबर रोजी संपूर्ण जगभरात 'वर्ल्ड आर्थ्रायटिस डे' म्हणजेच 'जागतिक संधिवात दिवस' साजरा केला जातो. याचा उद्देश म्हणजे लोकांमध्ये सांधेदुखी (आर्थ्रायटिस) या वाढत्या विकाराबद्दल जागरूकता निर्माण करणे. सांधे म्हणजे शरीराच्या हालचालींचा आधार, त्यामुळे त्यांचं आरोग्य चांगलं राहणं अत्यंत आवश्यक आहे.



सांधेदुखीची सामान्य लक्षणे

सकाळी उठल्यावर सांधे कडकणे किंवा दुखणे. चालताना, जिने चढताना किंवा बसताना त्रास होणे. सांध्यांत सूज किंवा ताण जाणवणे. हात वळवताना किरकिर आवाज येणे. सतत थकवा किंवा अंगदुखी जाणवणे

सांधेदुखी कमी करण्यासाठी उपयुक्त सवयी

१. नियमित व्यायाम

रोज चालणे, स्ट्रेचिंग, योगासने किंवा हलका व्यायाम करा. यामुळे रक्ताभिसरण सुधारते, सांधे लवचिक राहतात आणि वेदना कमी होतात.

२. हळदीचा काढा किंवा दूध

हळदीतील कर्क्युमिन घटक नैसर्गिकरीत्या सूज कमी करतो. रात्री हळदीचे दूध किंवा आठवड्यात काही वेळा हळदीचा काढा घेणे फायदेशीर ठरते.

३. वजन नियंत्रण

जास्त वजनामुळे गुडघे आणि कंबर यांवर ताण येतो. योग्य वजन ठेवल्यास सांधे मजबूत राहतात.

४. पुरेशी झोप आणि ताणमुक्त जीवनशैली

झोप कमी किंवा ताण अधिक असल्यास शरीरात सूज निर्माण करणारे हार्मोन्स वाढतात. ध्यान, प्राणायाम आणि विश्रांतीसाठी वेळ देणे आवश्यक आहे.

जर सतत सांध्यांमध्ये वेदना, सूज किंवा हालचालींमध्ये अडथळा जाणवत असेल, तर वेळ न दवडता ऑर्थोपेडिक तज्ज्ञांचा सल्ला घ्या. वेळेत निदान आणि योग्य उपचारामुळे पुढील गुंतागुंत टाळता येते.

(या माहितीमध्ये दिलेले आरोग्यविषयक सल्ले सामान्य माहितीवर आधारित आहेत.)

# कर्जतमध्ये घरफोडीचे सहा गुन्हे उघडकीस; अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत फार्म हाऊस आणि घरफोडीच्या घटनांमधून इन्व्हर्टर, बॅटरी, टीव्ही, वॉशिंग मशीन, बोअरिंग पंप तसेच लोखंडी पाइप चोरणाऱ्या दोन संशयितांना कर्जत पोलिसांनी अटक केली आहे. सहा वेगवेगळ्या गुन्ह्यांची उकल करत पोलिसांनी सुमारे दोन लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. कर्जत पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने ही कारवाई केली.



सप्टेंबर २०२६ मध्ये दाखल झालेल्या कर्जत पोलीस ठाण्यातील गुन्हा रजिस्टर क्रमांक ३५५, ३५६, ३५७, ३५८, ३६७ आणि ३६८ या सहा गुन्ह्यांचा तपास करताना पोलिसांना यश आले.

गोपनीय माहितीच्या आधारे सुबवे येथील तुषार चवळे आणि राहुल पेमारे या दोघांना ताब्यात घेण्यात आले. त्यांनी संगनमताने कशेळे परिसरातील विविध फार्म हाऊस, घरांमध्ये तसेच बांधकामासाठी आणून ठेवलेल्या साहित्याची चोरी केल्याचा पोलिसांचा आरोप आहे. या चोऱ्यांमध्ये बोअरिंगची मोटर, वॉशिंग मशीन, ३२ इंची टीव्ही, चार बॅटरी, चार इन्व्हर्टर, मोटारसायकल आणि १८ जीआय लोखंडी पाइप यांचा समावेश आहे.

कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण कक्षाच्या सहाय्यक महिला पोलीस निरीक्षक मनीषा लटपटे यांच्या पथकाने ही कामगिरी केली. कशेळे दूरक्षेत्रातील हवालदार लालासाहेब तोरवे, कॉन्स्टेबल राहुल जाधव, गुन्हे प्रकटीकरण कक्षातील केशव नागरगोजे, समीर भोईर, स्वप्निल येरुनकर, सतीश पाटील, योगेश गर्जे, ऋतिक गोऱ्हाणे आणि घुले यांनी तपासात सहभाग घेतला.



**पुणे : पुणे येथे मंत्री चंद्रकांत पाटील यांची माणगाव येथील भाजपच्या सक्रिय कार्यकर्त्या तथा प्रदेश भाजपच्या सचिव यशोधरा गोडबोले यांनी भेट घेऊन रायगड जिल्ह्यातील पक्ष संघटना व विविध विकासात्मक कामांबाबत सविस्तर चर्चा केली.**

## चौलमध्ये तीन दिवसीय ज्ञानयज्ञ संपन्न

### इतिहास आणि सागरी सुरक्षेवर मंथन

**चौल : प्रतिनिधी**

चौल येथील ब्राह्मण समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला तीन दिवसीय ज्ञानयज्ञ कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि ज्ञानवर्धक वातावरणात संपन्न झाला. १४ ते १६ ऑक्टोबरदरम्यान चौल नाका येथील सुंदर नारायण मंदिरात आयोजित या उपक्रमाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमात ऐतिहासिक वारसा, पुरातत्त्वशास्त्र, खगोलशास्त्र आणि सागरी सुरक्षा अशा विविध विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली, तसेच पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात आले.



कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी प्राचीन चौल व्यापारी बंदराचा इतिहास या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी सचिन जोशी यांनी चौल पुरातत्त्वीय उत्खनन : कारणे, महत्त्व आणि परिणाम या विषयावर मार्गदर्शन केले. चौलच्या प्राचीन व्यापारी बंदराचा इतिहास, पुरातत्त्वीय उत्खननाचे महत्त्व आणि ऐतिहासिक वारशाचे जतन याविषयी त्यांनी माहिती दिली. दुसऱ्या दिवशी आशा कुलकर्णी यांनी आकाशातील ग्रह... पृथ्वीवर उलथापालथ! या विषयावर व्याख्यान दिले. खगोलशास्त्र, ग्रहांविषयीची वैज्ञानिक माहिती आणि पृथ्वीशी संबंधित विविध खगोलीय घडामोडी याविषयी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

तिसऱ्या दिवशी अनिल वामन देशमुख यांनी सागरी सीमा सुरक्षा या विषयावर विचार मांडले. देशाच्या सागरी सीमांचे संरक्षण, सागरी सुरक्षेचे महत्त्व आणि या संदर्भातील विविध आव्हाने याविषयी त्यांनी उपस्थितांना माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विश्वास जोशी यांनी केले. ज्ञानवर्धक उपक्रमातून इतिहास, विज्ञान व राष्ट्रीय सुरक्षेसारख्या विषयांची माहिती नागरिकांना मिळाली. ऐतिहासिक वारशाबाबत जागरूकता, वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन व समाजात ज्ञानाची आवड वाढविणे हा उपक्रमाचा उद्देश होता.

ब्राह्मण समाजाच्या अध्यक्षा सुषमा आचार्य, उपाध्यक्ष संकेत जोशी व खजिनदार निवास परांजपे यांच्या सहभागातून उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. तीन दिवस चाललेल्या ज्ञानयज्ञामुळे चौलच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक परंपरेसोबतच विज्ञान व राष्ट्रीय सुरक्षेविषयी जाणून घेण्याची संधी नागरिकांना मिळाली.

## नांदगाव हायस्कूलमध्ये संगीत शिक्षणाचे धडे



**मुरुड : प्रतिनिधी**

येथील छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय, यशवंतनगर नांदगाव येथे ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांना संगीताचे धडे मिळावेत यासाठी आठवड्यातील प्रत्येक शनिवारी संगीताचे धडे देण्यात येणार आहेत. या शाळेतील शिक्षक सागर राऊत यांनी विद्यार्थ्यांना संगीताचे धडे मिळावेत यासाठी अग्रक्रमाने सहभाग नोंदवत जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली.

येथील शालेय विद्यार्थ्यांना दर शनिवारी पखवाज, ढोलकी, तबला वादनाचे धडे गिरवण्यात येणार आहेत. अभ्यासाबरोबरच संगीत क्षेत्रात विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करावी यासाठी शाळेकडून हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे.


**: जाहीर नोटीस :**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील प्रमाणे वर्णन केलेली शेती मिळकत त्या मिळकतीसमोर लिहीलेल्या मालक/कब्जेदार कडून आमचे अशिल विकत घेणार आहेत. सदर मालक/कब्जेदार आमचे अशिलाचे सोबत रजिस्टर्ड खरेदीखत करणार आहेत. सदर शेती मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

मिळकतीचे वर्णन

मौजे–आंबे तर्फे वाजे, ता. पनवेल, जि. रायगड

| मालक /कब्जेदाराचे नांव | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १) वेणूनाथ नारायण म्हात्रे | ३/११ | ०–५४–९० पैकी ०–२५–०० | १५.३९ |

वर नमूद केलेल्या शेती मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसीत करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहीवाटीचा हक्क, नावा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांच्या आत त्वरीत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर शेती मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल वर नमुद केलेले मालक/कब्जेदारबरोबर ठरविलेला कायम खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व खरेदीखत रजिस्टर्ड करतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सही,
श्री. शुभम मधुकर बोलके
ॲडव्होकेट हायकोर्ट
टेंभोडे, ता. पनवेल, जि. रायगड.
मो. क्र. ७०२१४४६३६६

ठिकाण– पनवेल
दिनांक– २०/१०/२०२६



**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन – ४२१५०३, ता. अंबरनाथ जि.ठाणे.
ई–मेलः– coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in, वेबसाइट :– kbmc.gov.in.

जा.क्र : कुबनप/नगरोत्थान/साबां / १०४१ /२०२६–२७ दिनांक : १९/१०/२०२६

**जाहिर ई- निविदा सुचना क्र. ४५ / २०२६-२७**

कुळगांव–बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत सन २०२६–२७ करिता प्रशासकीय मंजूर प्राप्त झालेल्या ०३ विकास कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई–निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई–निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि.२१/१०/२०२६ ते दि.२८/१०/२०२६ रोजी दुपारी १२.१२ वाजेपर्यंत असून दि. २३/१०/२०२६ रोजी दुपारी. १२.०० वा निविदा पुर्व बैठक नगरपरिषद कार्यालयात आयोजित केलेली आहे. तसेच सदरची ई–निविदा दि. २९/१०/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजल्यानंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

सही/-
(मारुती गायकवाड)
मुख्याधिकारी
कुळगांव बदलापूर नगरपरिषद



**पाहिजेत : दैनंदिन ठेव प्रतिनिधी**

**एम.व्ही.टी.व्ही. सहकारी पतपेढी लि., शाखा : पनवेल**

४७ वर्षांची सहकाराची परंपरा आणि ६०,०००+ सभासदांचा विश्वास. ३५० कोटींहून अधिक व्यवसाय आणि ६ शाखांचे विस्तृत जाळे.

पनवेल व परिसरासाठी दैनिक ठेव संकलन करणाऱ्या प्रामाणिक आणि मेहनती उमेदवारांची आवश्यकता.

**पात्रता :** किमान १० वी किंवा १२ वी उत्तीर्ण
**वयोमर्यादा :** वय वर्षे ६० पर्यंत.
**अनुभव :** पतपेढी किंवा बँकिंग क्षेत्रातील अनुभवी उमेदवारांना व स्थानिकांना प्राधान्य.
**फायदे :** आकर्षक कमिशन व प्रगतीची संधी.

इच्छुक उमेदवारांनी आपला बायोडाटा व आवश्यक कागदपत्रांसह प्रत्यक्ष भेट द्यावी.

**पत्ता :** शॉप नं – ३, नील आंगण अपार्टमेंट, प्लॉट नं २९, सेक्टर – १९, न्यू पनवेल, ४१० २०६.
**मोबाईल :** ८६५७४७३५७३/९७६८८८०३१३
**Email ID :** umesh@mvtvccs.com
**वेळ :** सकाळी ९:३० ते ५:३०


## आधार जनसेवा संस्थेचा प्रथम वर्धापन दिन उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

समाजातील वंचित, गरजू आणि दुर्बल घटकांना मदतीचा हात देऊन त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. आधार जनसेवा सामाजिक संस्थेने एका वर्षात केलेले कार्य कौतुकास्पद असून संस्थेने गरजूंच्या जीवनाचा खरा आधार बनावे, असे आवाहन नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांनी केले. आधार जनसेवा सामाजिक संस्थेच्या प्रथम वर्धापन दिनाचे आयोजन महिला मंडळाच्या सभागृहात करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.




आधार जनसेवा सामाजिक संस्था गेल्या वर्षभरापासून सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, शासकीय योजना, कला, क्रीडा आणि उद्योग अशा विविध क्षेत्रांत कार्यरत आहे. संस्थेने पहिल्याच वर्षात तब्बल १८ शिबिरांचे आयोजन करून समाजातील विविध घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविला. संस्थेच्या या कार्याचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. समारंभात विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. जीवनगौरव पुरस्काराने अभिनेते अशोक उर्फ चंद्रकांत विरळीकर, गणेश कांबळे, मीनाक्षी भवार व सुनील चव्हाण यांना सन्मानित करण्यात आले.

कायदारत्न पुरस्कार कैलास मोरे यांना, राष्ट्रीय साहित्यरत्न पुरस्कार नागनाथ डोलारे यांना, तर पत्रकारिता पुरस्कार योगेश सरावते यांना प्रदान करण्यात आला. जनसेवक पुरस्काराने गोपीलाल ओसवाल, आमिर मनियार, छाया प्रमोद कुलकर्णी आणि विकास वाघमारे यांचा गौरव करण्यात आला. रणरागिणी पुरस्कार संगीता कांबळे यांना, तर कलारत्न पुरस्कार गायक मुकुंद सोनवणे व गायक अजय गायकवाड यांना देण्यात आला. उत्कृष्ट निवेदक म्हणून तुषार कांबळे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी २५० महिलांना साड्यांचे वाटप व आदिवासी विद्यार्थिनींना गणवेश वाटप करण्यात आले. यावेळी रेखा जाधव, आमिर मनियार, डी. एस. धनवे, सारिका माने, महादेव म्हात्रे, रश्मी कांबळे, सूरजबली यादव, सेजल पाल, संदीप पावसकर, देवेंद्र भारती, कांता गाडे, दामोदर गायकवाड, लीला जाधव आदी उपस्थित होते.

## कर्जतमध्ये फोर्टी प्लस क्रिकेट हंगामाला प्रारंभ

**कर्जत : प्रतिनिधी**

विजयादशमीच्या मुहूर्तावर कर्जत फोर्टी प्लस क्रिकेट हंगामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी ७२–७३ वर्षांचे ज्येष्ठ खेळाडूही उत्साहात उपस्थित होते. जुन्या आठवणींना उजाळा देत सर्वजण हास्यविनोदात रंगून गेले होते. कर्जत शहरातील दहिवलीमधील बाल गोपाळ मैदानात क्रिकेट हंगामाच्या शुभारंभाचे आयोजन केले होते. संघटनेचे ज्येष्ठ मार्गदर्शक मधु सुर्वे आणि रणजीत जैन यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.

यावेळी अध्यक्ष शशांक शेट्टी, गजेंद्र दांडेकर, विनायक परांजपे, सुनील जाधव, शिरीष दिघे, महेंद्र निगुडकर, राजू जैन, राजेश लाड, दिनेश कडू, समीर चव्हाण, विराग फाटक, सचिन मनोरे, सुरेश मोहिते, सुनील खातू, विकास चित्ते आदी उपस्थित होते. राजेश लाड यांनी जुन्या आठवणी काढताना गिरीश सुर्वे यांना संघटनेच्या वतीने श्रद्धांजली अर्पण केली.

अध्यक्ष शशांक शेट्टी यांनी फोर्टी प्लस क्रिकेटचा आनंद घेत आपली संघटना नेहमीच कार्यरत राहील. फोर्टी प्लस क्रिकेट खेळण्यासाठी कर्जतमध्ये एखादे मैदान उपलब्ध व्हावे यासाठी प्रयत्न करणार आहे, असे सांगितले.




**सिडको** शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधितांना निवाड्याबाबत अटी व हरकती प्राप्त कर्ण्याकरिता प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) | मंजूर पात्रता | वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधीत न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नोड– द्रोणागीरी | | | | | | | | |
| १ | २४६९ | चाणजे ६०ब/८५ | ४३९/० | ४–५४–० | ३९५० चौ.मी. पैकी २८०० चौ.मी. | नोड–द्रोणागिरी, सेक्टर–६५, भूखंड क्र. ५७, क्षेत्र – २८०० चौ.मी. प्रस्तावित | **श्री. जनार्दन देवजी ऊर्फ देवराम म्हात्रे** मयत यांचा वारस दाखला क्र. २२३/२०२५ या वारस दाखल्यांमध्ये १) श्री. पद्माकर जनार्दन म्हात्रे २) श्री. मनोहर जनार्दन म्हात्रे ३) श्री. परशुराम जनार्दन म्हात्रे ४) श्रीमती देहुबाई जनार्दन म्हात्रे ५) श्रीमती नलिनी सुरेश म्हात्रे असे वारस घोषीत केले असून पैकी अ.क्र. ४ मधील भूधारक **श्रीमती देहुबाई जनार्दन म्हात्रे** हया मयत झाल्या आहेत. त्यानुसार भूधारक यांनी मा. दिवाणी न्यायालय, उरण यांचे न्यायालयात वारस दाखल्याकरीता १८२/२०२६ नुसार अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जामध्ये **श्रीमती देहुबाई जनार्दन म्हात्रे** मयत यांचे वारस म्हणून १) श्री. पद्माकर जनार्दन म्हात्रे २) श्री. मनोहर जनार्दन म्हात्रे ३) श्री. परशुराम जनार्दन म्हात्रे ४) श्रीमती नलिनी सुरेश म्हात्रे हे वारस असल्याबाबत रोजनामा, निशाणी–१, जाहीरनामा व दिवाणी चौकशी अर्ज क्र. १८२/२०२६ सादर केलेला आहे तसेच **मा. दिवाणी न्यायालय, उरण १८१/२०२६ नुसार श्रीमती लिलाबाई शंकर घरत (मयत)** यांचे वारस म्हणून श्रीमती हेमलता महादेव पाटील यांचे नावे घोषित करणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. | मुळ भूधारक श्री. देवराम ऊर्फ देवजी काना म्हात्रे (मयत) यांची एकूण पात्रता ३९७२.५० चौ.मी. पुर्णांकात ३९५० चौ.मी. पात्रता मंजुर असून, मंजूर पात्रतेपैकी असून जिल्हा न्यायालय, रायगड, अलिबाग यांचे दि. २७.१०.२००४ रोजीच्या आदेशानुसार श्री. देवजी काना म्हात्रे (मयत) यांच्या वारसांना ३९५० चौ.मी. पैकी जनार्दन देवराम म्हात्रे यांना १५/२४ हिस्सा म्हणजे २४५० चौ.मी. पात्रता तसेच श्रीमती लिलाबाई शंकर घरत यांना ३९५० चौ.मी. पैकी २/२४ हिस्सा म्हणजेच ३५० चौ.मी. पात्रता व उर्वरित ३९५० चौ.मी. पैकी श्रीमती बेबीबाई हिराजी तांडेल यांना ७/२४ हिस्सा म्हणजेच ११५० चौ.मी. पात्रता अशी विभागणी करण्यात आलेली आहे. मंजूर पात्रतेपैकी श्री. जनार्दन देवराम म्हात्रे व श्रीमती लिलाबाई शंकर घरत यांची एकत्रित २४५०+३५० अशी एकूण २८०० चौ.मी. पात्रता वाटप करणेकामी प्रस्तावित आहे. |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा / हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :–** **अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, १२.५ टक्के भूमी विभाग, सिडको भवन, तळमजळा, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (द्रोणागीरी)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२६१/२०२६–२७

# ‘येत्या सहा महिन्यांत अनेकांना त्यांची जागा दाखवणार’

**नवी मुंबई : बातमीदार**



नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्रमात बोलताना माजी मंत्री गणेश नाईक यांनी मंगळवारी भावे नाट्यगृहातील नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्रमात विरोधी पक्षांवर आणि राजकीय विरोधकांवर जोरदार निशाणा साधला आहे. "येत्या सहा महिन्यांत मी अनेकांना त्यांची जागा दाखवून देईन. हात न उचलता आणि शिवीगाळ न करता, माझ्या स्वतःच्या पद्धतीने मी त्यांना उत्तर देणार," असा थेट इशारा त्यांनी दिला.

भाषण करताना नाईक म्हणाले की, धमक्यांना आम्ही घाबरत नाही आणि कोणालाही विनाकारण त्रासही देत नाही. "ज्या लोकांचे विचार किंवा वर्तन चुकीचे आहे, त्यांना 'डिफ्यूज' करण्याची गरज आहे. जर कोणी गैरसमजात असेल किंवा चुकत असेल तर त्याने सुधारावे, नाही सुधारल्यास माझ्या पद्धतीने उत्तर दिले जाईल," असे ते म्हणाले.

तसेच, १९९५ पासूनच्या पालिका कामांचे किंवा कारभाराचे ऑडिट करण्याचे आव्हान त्यांनी दिले. जर त्यात भ्रष्टाचार किंवा चूक आढळली तर त्यावर कारवाई व्हावी, असेही ते म्हणाले. "सार्वजनिक आयुष्यात टीका सहन करण्याची ताकद असली पाहिजे. विषारी वक्तव्ये करून वातावरण बिघडवू नका," असा सल्लाही त्यांनी दिला.

# आईस्क्रीम फ्रँचायझीच्या आमिषाने उलवेतील तरुणाला गंडा

**पनवेल : वार्ताहर**

प्रसिद्ध नॅचरल आईस्क्रीमची फ्रँचायझी मिळवून देण्याचे आमिष दाखवून उलवे येथील एका २४ वर्षीय बेरोजगार तरुणाची ६ लाख २४ हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी उलवे पोलीस ठाण्यात सायबर भामट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणातील तक्रारदार नीरज पाटील हा उलवे सेक्टर २३ येथे राहतो. नोकरीच्या शोधात असताना त्याला इन्स्टाग्राम आणि मोबाईलच्या माध्यमातून नॅचरल आईस्क्रीमची फ्रँचायझी देण्याचे आमिष दाखवण्यात आले. आरोपींनी कंपनीच्या नावाने बनावट ई-मेल आयडी तयार करून नीरजशी संपर्क साधला. व्यवसायातून चांगला नफा मिळेल, असे सांगून त्याचा विश्वास संपादन केला.

त्यानंतर फ्रँचायझी देण्याच्या बहाण्याने आरोपींनी वेगवेगळी कारणे सांगून नीरजकडून वेळोवेळी ऑनलाइन पद्धतीने एकूण ६ लाख २४ हजार रुपये हस्तांतरित करून घेतले. पैसे भरल्यानंतर नीरजने नॅचरल आईस्क्रीमच्या मुख्य कार्यालयाशी संपर्क साधून खातरजमा केली. त्यावेळी गेल्या दोन वर्षांपासून कंपनीकडून अशा प्रकारची कोणतीही फ्रँचायझी दिली जात नसल्याची माहिती त्याला मिळाली.

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर नीरजने आरोपीशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; मात्र आरोपी टाळाटाळ करू लागले. अखेर नीरजने उलवे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

# गव्हाण विद्यालयात पारंपरिक भोंडल्याचा अनोखा जल्लोष!

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**



नवरात्रोत्सव म्हटले की सर्वत्र गरबा आणि दांडियाची धूम पाहायला मिळते. मात्र, आधुनिक उत्सवांच्या रंगात आपली समृद्ध मराठमोळी संस्कृती आणि पारंपरिक लोककला यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे, या उद्देशाने रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे सोमवार, दिनांक १९ ऑक्टोबर रोजी नवरात्रोत्सवानिमित्त पारंपरिक भोंडल्याच्या कार्यक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण विद्यालय परिसर सांस्कृतिक रंगांनी न्हाऊन निघाला.

विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सांस्कृतिक विभागप्रमुख हर्षला पाटील यांच्या नियोजनातून या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पारंपरिक लोकसंस्कृतीचा आनंद अनुभवला. कार्यक्रमाची सुरुवात हत्तीपूजन आणि कलशपूजनाने करण्यात आली. त्यानंतर सर्वांना शारदीय नवरात्रोत्सवाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

दुर्गामातेची आरती करून भक्तिमय वातावरणात सांस्कृतिक कार्यक्रमाला प्रारंभ झाला. मराठी आणि हिंदी गीतांच्या तालावर विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य सादर करत उपस्थितांची मने जिंकली. पारंपरिक भोंडल्याच्या उत्साहाबरोबरच गरब्याच्या तालावर विद्यार्थ्यांनी ठेका धरल्याने कार्यक्रमात उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले.विशेष म्हणजे, या कार्यक्रमात केवळ विद्यार्थ्यांनीच नव्हे, तर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला. शिक्षणासोबतच आनंद, संस्कृती आणि सामूहिक सहभाग यांचा सुंदर संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला.

भोंडला हा महाराष्ट्रातील पारंपरिक लोकउत्सव असून, त्यातून स्त्रीशक्तीचा सन्मान, निसर्गाविषयी कृतज्ञता, सामूहिक आनंद आणि लोकपरंपरांचे जतन यांचा संदेश मिळतो. आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानप्रधान युगात विद्यार्थ्यांना आपल्या सांस्कृतिक वारशाची ओळख व्हावी, पारंपरिक सण-उत्सवांमागील भावना समजाव्यात आणि आपल्या लोककलेविषयी अभिमान निर्माण व्हावा, या हेतूने विद्यालयाने या उपक्रमाचे आयोजन केले होते.



# उरणच्या तीन खेळाडूंची राष्ट्रीय बँडी स्पर्धेत सुवर्ण भरारी

**उरण : बातमीदार**

आठव्या राष्ट्रीय बँडी अजिंक्यपद स्पर्धा २०२६ मध्ये रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील तीन युवा खेळाडूंनी सुवर्णपदक पटकावत घवघवीत यश संपादन केले आहे. वरदा केदार असारकर, सात्विक बाजी आणि शिवांश तांडेल या तिन्ही खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर सुवर्णपदक मिळवून उरणच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या स्पर्धेत वरदा असारकर हिने १२ वर्षांखालील मुलींच्या (U-१२ Girls) गटातून सहभाग घेत सुवर्णपदक पटकावले. तर सात्विक बाजी आणि शिवांश तांडेल यांनी १२ वर्षांखालील मुलांच्या (U-१२ Boys) गटातून खेळताना सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. तिन्ही खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर मिळवलेले हे यश उरणसह संपूर्ण रायगड जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे.

या खेळाडूंच्या यशामागे त्यांची मेहनत, जिद्द, चिकाटी आणि नियमित सराव यांचा मोठा वाटा आहे. त्यांना प्रशिक्षक प्रीती पाटील आणि राकेश पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# वीर वाजेकर महाविद्यालयात गरबा नृत्याचे आयोजन



**उरण : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, फुंडेउरण येथे लायन्स क्लब ऑफ वीर वाजेकर कॅम्पस, भारतीय ज्ञान परंपरा (IKS) समिती व सांस्कृतिक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्रोत्सवानिमित्त गरबा नृत्य कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या परिसरात आयोजित करण्यात आले.

भारतीय संस्कृती, परंपरा आणि लोककलेचे जतन व संवर्धन करणे, विद्यार्थ्यांना पारंपरिक नृत्यकलेची ओळख करून देणे तसेच त्यांच्यातील कलागुणांना वाव देणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता. गरबा नृत्याच्या माध्यमातून नवरात्रोत्सवाचा आनंद साजरा करण्याबरोबरच विद्यार्थ्यांना आपल्या सांस्कृतिक वारसा चे महत्त्व समजावे, यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होऊन जल्लोषात गरबा नृत्याचे सादरीकरण केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक जाणीव, सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि एकात्मतेची भावना वृद्धिंगत होण्यास मदत होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापकवर्ग आणि भारतीय ज्ञान परंपरा (IKS) समिती व सांस्कृतिक समिती यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम आपली संस्कृती, आपली परंपरा, आपला अभिमान!” या भावनेतून आयोजित करण्यात आलेला हा गरबा नृत्य उपक्रम भारतीय सांस्कृतिक वारशाचे जतन करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.









पनवेल : नवरात्र उत्सवा निमित्त लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी खांदा कॅालनी , कामोठे, उलवे ,मोरावा येथिल मंडळांना भेट देऊन दर्शन घेतले .यावेळी त्यांनी देवीचे मनोभावे पूजन करून सर्वांच्या सुख, समृद्धी आणि उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना केली.



पनवेल : नवरात्र उत्सवा निमित्त धनगर समाजाचे पारंपारिक गजी गजी मंडळाचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते या सेक्टर ३५ येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी उद्यानाचे नामकरण करण्यात आले.यावेळी भारतीय जनता पार्टीचे कामोठे शहर अध्यक्ष विकास घरत, नगरसेवक हॅप्पी सिंग, , समाजसेवक भाऊ भगत राजमाता अहिल्यादेवी संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब बुधे कार्याध्यक्ष गणेश बेरगळ उपाध्यक्ष पांडुरंग यमगर सचिव कैलास सरगर खजिनदार अशोक माने, सदस्य नानासाहेब मगदूम सर्व पदाधिकारी व समाजातील कार्यकर्ते उपस्थित होते.



पनवेल : जय हनुमान सांस्कृतिक व सामाजिक विकास मंडळ व पारनेरकर रहिवासी संघ कामोठे.आयोजित खांदेश्वरची माऊली नवरात्र उत्सवाला लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते नगरसेवक परेश ठाकूर, यांनी भेट दिली. यावेळी मुख्य आयोजक सतिश पाटील,पनवेल शहर ओबीसी मोर्चा अध्यक्ष कृष्णा ढोमे सचिवपारनेर रहिवासी संघ, महेन्द्र कावळे ,नगरसेवक, मोतीलाल कोळी सरचिटणीस उत्तर रायगड जिल्हा कामगार आघाडी, परेश पाटील, नितेश पाटील उपस्थित होते.





**दुर्गामाता दौड : (माळ दहावी)**





पनवेल : विजयादशमी अर्थात दसऱ्याच्या मंगल पर्वावर श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, पनवेल तालुका यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली श्री दुर्गामाता महादौड मंगळवार, दिनांक २० ऑक्टोबर रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या महादौडीत पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, नगरसेवक रोहित झुंजारराव आणि नगरसेवक गणेश कडू यांचेसह . पनवेलमधील विविध गावांतील धारकरी, शिवभक्त आणि हिंदू बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



# रायगडात दसरा उत्साहात

## वाहनखरेदीसह बाजारपेठांमध्ये लगबग



अलिबाग : सोने खरेदी करण्यासाठी ग्राहकांची गर्दी.

**अलिबाग : प्रतिनिधी**

साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जाणारा विजयादशमी अर्थात दसरा रायगड जिल्ह्यात मंगळवारी पारंपरिक उत्साहात साजरा करण्यात आला. नऊ दिवसांच्या नवरात्रोत्सवाचीही यानिमित्ताने सांगता झाली. यंदा नवरात्रोत्सवावर परतीच्या पावसाचे सावट असतानाही धार्मिक विधी, देवीदर्शन, शस्त्रपूजन आणि दसऱ्यानिमित्तच्या खरेदीचा उत्साह कायम राहिला.



नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत जिल्ह्यात विविध ठिकाणी देवीची पूजाअर्चा, भजन, गरबा आणि दांडियाचे आयोजन करण्यात आले होते. विजयादशमीच्या दिवशी घरोघरी धार्मिक वातावरण पाहायला मिळाले. दाराला तोरण बांधून देवासमोर शस्त्रपूजन करण्यात आले. वाहनांची स्वच्छता करून पूजा करण्यात आली, तर व्यापाऱ्यांनी दुकानांमधील वजनमापे आणि व्यावसायिक साहित्याचे पूजन केले.

सायंकाळी आपट्याची पाने सोने म्हणून लुटण्याची परंपरा जपत नागरिकांनी एकमेकांना दसऱ्याच्या शुभेच्छा दिल्या. नवरात्रोत्सवातील देवीच्या मूर्तींचे विसर्जनही विविध ठिकाणी करण्यात आले. विसर्जन मिरवणुकांमुळे अनेक भागांत उत्सवी वातावरण निर्माण झाले.

दसऱ्याच्या मुहूर्तावर नवीन वस्तू खरेदी करण्याच्या परंपरेमुळे बाजारपेठांमध्ये ग्राहकांची लगबग दिसून आली. वाहनखरेदीला विशेष पसंती मिळाली. त्याचबरोबर सोने, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि मोबाईल खरेदीकडेही ग्राहकांचा कल होता. अनेक ठिकाणी नवीन दुकानांचे उद्घाटन, तसेच बांधकामांच्या भूमिपूजनाचे कार्यक्रम पार पडले.दसऱ्याच्या निमित्ताने घरोघरी श्रीखंड-पुरीचा बेत आखण्यात आला होता. त्यामुळे मिठाईच्या दुकानांमध्येही खरेदीची लगबग होती. समाजमाध्यमांवरूनही दिवसभर शुभेच्छांची देवाणघेवाण सुरू होती.

नवरात्रोत्सव आणि दसऱ्याच्या आनंदावर यंदा अवकाळी पाऊस आणि पावसाच्या अनियमिततेचे सावटही होते. जिल्ह्यात काही ठिकाणी अवकाळी पावसामुळे भातपिकाचे नुकसान झाले, तर काही भागांत पावसाअभावी भातपिकाच्या वाढीवर आणि उत्पादनावर परिणाम झाला आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, एका बाजूला दसऱ्याचा उत्साह आणि दुसऱ्या बाजूला हाताशी आलेल्या भातपिकाच्या नुकसानीची चिंता, असे चित्र ग्रामीण भागात पाहायला मिळत आहे.

नवरात्रोत्सव हा शक्तीच्या उपासनेचा आणि विजयादशमी हा चांगल्यावर वाईटाच्या विजयाचे प्रतीक मानला जाणारा सण आहे. परतीच्या पावसामुळे काही प्रमाणात अडथळे निर्माण झाले असले, तरी धार्मिक परंपरा आणि सणाचा उत्साह जपत रायगडकरांनी साजरा केला.



अलिबाग : सरखेल कान्होजी आंग्रे यांनी युद्धात वापरलेल्या शस्त्रांचे पूजन विजयादशमीच्या दिवशी आंग्रे घराण्याकडून करण्यात आले.

# रोह्याचे श्री धावीर महाराज देवघटावरून उठले; आज पालखी सोहळा

**धाटाव : प्रतिनिधी**

अवघ्या रायगड वासियांचे श्रध्दास्थान आणी रोहयाचे ग्रामदैवत श्री धावीर महाराजांना दसऱ्याच्या दिवशी दहाव्या माळेला देवघटावरून मोठया भक्तीभावनेने उठविण्यात आले. उद्या बुधवारी महाराजांच्या पालखी उत्सवास सुरुवात होणार असून यावेळी महाराजांना रायगड पोलिसांकडून दिली जाणारी सशस्त्र मानवंदनेची आणि पालखी सोहळ्याचे वेध रोहेकरांना लागले आहेत.

बदलत्या काळानुरूप पोटापाण्यासाठी गावाबाहेर गेलेल्या रोहावासियांची नाळ या ग्रामदेवतेशी जोडलेली. म्हणूनच या पालखी उत्सवास रोहावासी आपल्या गावी येणारच.. भक्ताच्या भेटीसाठी येणाऱ्या आपल्या या ग्रामदेवतेचे आपल्या दारी स्वागत, पूजन करण्यासाठी त्याची पाऊले आपल्या गावाकडे वळतात..

धावीर महाराजांचे मूळ स्थान रोह्यातील वराठी डोंगरावर आहे. ते रोह्यात कसे आले याविषयी एक आख्यायिका आहे. आपला भाऊ धाकसुत याच्या मदतीने रोहा शाहरावर आलेली अनेक संकटे महाराजांनी दूर केली आणि आपला वरदहस्त ठेवत रोह्याचा विकास केला ही रोहावासियाःची दृढ श्रद्धा आहे!

शासनाच्या तीर्थक्षेत्रविकास योजनेतून सद्ध्याचे प्रेक्षणीय देवस्थान उभे आहे. धावीर महाराजांचे वास्तव्य, आकर्षक मांडणी आणि भक्तांची भक्ती यामुळे हा परीसर प्रशांत व मांगल्याने भरलेला आहे. धावीरमहाराज आपले चांगलेच करणार या श्रद्धेने रोहेकर येथे नतमस्तक होतात .धावीर महाराजांचे रूपदेखील नावाप्रमाणेच विशाल व भारदस्त. दहा वीरांचे तेज एकवटलेला त्याचा चेहरा. भारदस्त मिशा, लाल पगडी.. अन् तेवढेच वचक बसवणारे पण.. आशीर्वादयुक्त व प्रेमळ डोळे !



पोलिसांच्या मानवंदनेने सुरू होणारा हा पालखी सोहळा या कोकणातील एकमेव आहे. पालखी सोहळ्याच्या दिवशी पहाटेच रोहेकर लगबगीने देवस्थानाकडे जमतात. तथाकथित लोकनेते आणि हौशेनवशे यांचापण समावेश त्यात असतो. देवस्थानच्या ठिकाणी दिसणारा त्यांचा दिखाऊपणा हा रोहेकरांसाठी मनोरंजनात्मक खेळ असतो.

पोलीस सलामीची तयारी झाली की घंटानाद सुरू होतो. नगारा वाजू लागतो. भक्तांच्या टाळ्या वाजू लागतात.सकाळी ६.१५ ला धावीरांची महाआरती होते. धावीर महाराज की जय हा जयघोष आसमंत दणाणून टाकतो. एकीकडे देवस्थानचे रीतीरिवाज पूर्ण होतात. आणि 'धावीर महाराजको सलामी देंगे sss' असा खणखणीत हुकूम होतो.. एकदम शांतता पसरते.पोलीसांची मानवंदना होते. जळत्या कापूराच्या पायघड्यांवरून धावीर महाराज पालखीत विराजमान होतात. आणि वाद्यांच्या गजरात पालखी शहराकडे मार्गस्थ होते.

धार्मिक सलोख्याचे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणून या सोहळ्याकडे पाहता येईल. मोहल्ल्यातून मार्गक्रमण करत असताना मुस्लिम समाजाकडून पालखीचा आदर सन्मान केला जातो. मुस्लिम बांधवही मोठया भक्तीभावाने स्वागत करतात.हे या पालखी उत्सवाचे वैशिष्ट्य आहे.

ढोलताशांचे पथक, भजनी मंडळे, खालूबाजा पथके अबदागिरी, धूपपात्र. आणि त्यामागे सजवलेल्या पालखीत विराजमान झालेले धावीर महाराज त्यांचा जयघोष. अशा थाटात ही पालखी गावातील प्रत्येक घरी जाते. गावभर रांगोळ्यांची सजावट असते. आपल्या आळीत पालखी आली की तेथील कार्यकर्ते पालखी खांद्यावर घेतात. प्रत्येक घरासमोर पालखी थांबते. धाविरमहाराजांना आरती ओवाळून हार नारळ प्रसाद अर्पण केला जातो आणि ' धावीर महाराज की जय ' अशा जयघोषात धावीर महाराज पुढेपुढे जात असतात.आपल्या भक्तांना आशीर्वाद देत..अभय देत..!

दुसऱ्या दिवशी सकाळी हा सोहळा देवस्थानात परतला की पुन्हा धावीर महाराजांना पोलीस सलामी देण्यात येते.. देवस्थानाकडून सर्व समाजातील मान्यवरांचा सन्मान केला जातो. धावीर महाराज गाभाऱ्यात स्थानापन्न झाले की आरती व दर्शन घेऊन रोहेकर गावात परततात.

# मंत्री गोगावलेंच्या हस्ते २४ ऑक्टोबरला पत्रकार संघाचा पुरस्कार वितरण सोहळा

**माणगाव : प्रतिनिधी**

सामाजिक कार्यात रायगड जिल्ह्यात नावलौकिक कमाविलेल्या माणगाव तालुका पत्रकार संघाचे विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांना सन २०२६ या नवव्या वर्षातील पुरस्कार संघाचे अध्यक्ष सलीम शेख यांनी माणगाव येथे झालेल्या पत्रकार संघाच्या बैठकीत मंगळवार दि. २० ऑक्टोबर रोजी दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर जाहीर केले.

सदर पुरस्कारांचे वितरण तसेच समाजात काम करणाऱ्या मान्यवर व्यक्तींचा विशेष सत्कार सोहळा कार्यक्रमाचे आयोजन शनिवार दि.२४ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ३ वाजता कुणबी भवन हॉल,निजामपूर रोड,माणगाव याठिकाणी होणाऱ्या एका भव्य दिव्य सोहळ्यात महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले यांच्याहस्ते व अलिबाग विधानसभा मतदार संघाचे आ.महेंद्र दळवी,कर्जत – खालापूर विधानसभा मतदार संघाचे आ. महेंद्र थोरवे,युवासेना कोकण सचिव विकास गोगावले यांच्या विशेष उपस्थितीत करण्यात आले आहे.या पुरस्कार वितरण सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून मशिप्र मंडळाचे अध्यक्ष अँड.राजीव साबळे राहणार आहेत.

सन २०२६ चया पुरस्काराचे मानकरी प्रमोद अनंत म्हसकर( कोकणभूषण पुरस्कार ),डॉ. तझीन इस्माईल रहाटविलकर (वैद्यकीय सेवा पुरस्कार),गजानन इंदर अधिकारी ( शिक्षक क्षेत्र पुरस्कार),गीता उत्तम जाधव (आदर्श महिला लोकप्रतिनिधी पुरस्कार),दिपक नामदेव पाटील (आदर्शवत प्रशासकीय अधिकारी पुरस्कार),बापूसाहेब बाळासो शिंदे (कर्तव्यदक्ष वाहतूक पोलीस पुरस्कार),शलाका केदार गांधी (महिला उद्योजिका पुरस्कार),विद्या अंकुश साळवे( आदर्श मंडळ अधिकारी पुरस्कार),साक्षी सागर भोनकर (आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार),पुरुषोत्तम गोविंद मुळे (बाळशास्त्री जांभेकर दर्पण पुरस्कार),राजेश गोकुळदास मेहता (रायगडरत्न पुरस्कार),अकबरअली अब्दुलकादिर बडे (यशस्वी उद्योजक पुरस्कार),संताजी गोपीचंद पवार (समाजभूषण पुरस्कार),अँड. प्रसाद ज्योती प्रकाश धारिया (समाजरत्न पुरस्कार),वैष्णव वसंत साठे (आदर्श सरपंच पुरस्कार),डॉ. अनंत वामन खराडे (सामाजिक सेवा पुरस्कार),अबुबकर उस्मान गंगरेकर (प्रगतीशील शेतकरी पुरस्कार),संदिपशेठ मोहनभाई मोदी (सेवाभावी कार्यकर्ता पुरस्कार),दिनेश यशवंत मेथा (तरुण उद्योजक पुरस्कार),मंगेश काळूराम पवार ( समाजगौरव पुरस्कार) यांचा पुरस्काराने तर विशेष सत्कारमूर्ती डॉ.सुरभी संजय जुईकर,विक्रांत सतीश गांधी,लता उर्फ संजू मनोहर मेहता,सीमा सतीश मेथा,राकेश गजानन पवार,प्रकाश अशोक मोरे,महेश मारुती पोवार यांचा आ.भरत गोगावले यांच्याहस्ते सन्मान करण्यात येणार आहे.

# ज्ञानदेव पवार शिवसेनेचे श्रीवर्धन विधानसभा संपर्कप्रमुख

**माणगाव : प्रतिनिधी**

हिंदू हृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने आणि शिवसेना पक्षाचे मुख्यनेते राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने दक्षिण रायगड मधील श्रीवर्धन विधानसभा मतदार संघाच्या शिवसेना पक्षाच्या संपर्कप्रमुखपदी ज्ञानदेव मारुती पवार यांची नियुक्ती शिवसेना पक्षाचे सचिव संजय भाऊराव मोरे यांनी करून ज्ञानदेव पवार यांना तशा आशयाचे नियुक्तीपत्र आपल्या सहीनिशी दिले आहे. हे नियुक्तीपत्र ज्ञानदेव पवार याना पक्षाचे रायगड लोकसभा मतदार संघाचे संपर्कप्रमुख अनिल नवगणे व जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर यांच्याहस्ते नुकतेच माणगाव शासकीय विश्रामगृह येथे देण्यात आले.

.ज्ञानदेव पवार यांनी माणगावचे नगराध्यक्ष म्हणून चांगले काम केले असून सध्या ते विद्यमान नगरसेवक आहेत. आपल्या सहकार्यांना सोबत घेऊन ते पक्ष संघटनेचे काम करीत असतात. संघटनेच्या माध्यमांतून विविध प्रश्नांवर ते आवाज उठवीत असतात. ते बहुजन समाजात गेली अनेक वर्ष काम करीत आहेत. लोकांच्या सुखदुःखात ते धावून जातात. पक्ष संघटनेच्या माध्यमातून माणगाव शहराचा विकास त्यांनी नेहमी पहिला आहे. त्यांचा दांडगा जनसंपर्क व विविध क्षेत्रातील कार्य विचारात घेऊन त्यांची पक्ष नेतृत्वाने त्यांची श्रीवर्धन विधानसभा मतदार संघाच्या शिवसेना पक्षाच्या संपर्कप्रमुखपदी नियुक्ती केली आहे.

आपल्या नियुक्तीबद्दल प्रसार माध्यमांजवळ बोलताना ज्ञानदेव पवार म्हणाले कि,सर्व प्रथम मी पक्षाचे पक्षश्रेष्ठी यांचे मनापासून ऋण व आभार व्यक्त करतो. या पक्ष नेतृत्वाने माझ्यावर टाकलेली श्रीवर्धन विधानसभा मतदार संघाची जबाबदारी मी प्रामाणिकतेने व संघटनेतील सर्व जेष्ठ श्रेष्ठ कार्यकर्त्यांसह युवक कार्यकर्त्यांना सोबत घेऊन संघटनेचे काम करेन पक्ष संघटनेमार्फत विविध उपक्रम राबवून पक्षाची ध्येय – धोरणे तळागाळातील जनतेपर्यंत पोहचवून पक्ष संघटना मजबूत करण्याचा प्रयत्न करेन असे सांगितले.

# कलोते मोकाशीच्या ठाकूरवाडीत आदिवासी महिला व बालकांसाठी विशेष उपक्रम

**खालापूर : प्रतिनिधी**

नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून कलोते मोकाशी येथील ठाकूरवाडीत अश्वपरिस फाउंडेशनच्या वतीने आदिवासी महिला व बालकांसाठी बक्षीस वितरण, खाऊ वाटप, शैक्षणिक प्रोत्साहन तसेच जातीच्या दाखल्यासंदर्भात जनजागृतीपर विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



आदिवासी समाजातील मुलांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या गुणवत्तेचा गौरव व्हावा आणि त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा, या उद्देशाने बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच बालकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्यासाठी खाऊ वाटप करण्यात आले. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने आनंदाचे क्षण साजरे करण्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

आदिवासी बांधवांना जातीचा दाखला मिळविण्याची प्रक्रिया, त्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे आणि विविध शासकीय योजनांची माहिती देण्यावर भर देण्यात आला. माहितीच्या अभावामुळे समाजातील कोणताही पात्र लाभार्थी शासकीय सुविधांपासून वंचित राहू नये, हा या जनजागृती उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

# नवरात्रीचे नऊ रंग, पुस्तकांच्या संग : जिंदल विद्या मंदिरचा अनोखा वाचनप्रेरक उपक्रम

**मुरुड : प्रतिनिधी**

नवरात्रीच्या नऊ रंगांचा उत्सव पुस्तकांच्या सहवासात साजरा करत जिंदल विद्या मंदिर, साळाव येथे 'नवरात्री के नौ रंग, चलो मनाये किताबों के संग' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि त्यांना ग्रंथालयातील विविध पुस्तकांचा परिचय करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

नवरात्रीच्या प्रत्येक दिवशी त्या दिवसाच्या रंगानुसार वेगवेगळ्या रंगांची पुस्तके ग्रंथालयात आकर्षक पद्धतीने मांडण्यात आली. ही पुस्तके शोधून काढण्यासाठी विद्यार्थ्यांनीही उत्साहाने मदत केली. त्यामुळे विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील विविध पुस्तके हाताळण्याची, त्यांची ओळख करून घेण्याची आणि ग्रंथालयाचा मुक्तपणे शोध घेण्याची संधी मिळाली.



रंगानुसार सजवलेली पुस्तकांची मांडणी पाहून विद्यार्थ्यांमध्ये ती पुस्तके वाचण्याची उत्सुकता निर्माण झाली. विशेष म्हणजे, काही विद्यार्थी पुढील दिवसाच्या रंगाशी जुळणारी पुस्तके स्वतःहून घरून आणत होते. रंगांच्या आकर्षणातून पुस्तकांपर्यंत आणि पुस्तकांमधून वाचनाच्या आनंदापर्यंत पोहोचवणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आनंददायी अनुभव ठरला.

या उपक्रमाबद्दल जेईटी प्रमुख डॉ. भावेश भालेराव यांनी ग्रंथालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्याच्या या अभिनव प्रयत्नाचे कौतुक केले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा पुस्तकांशी संवाद वाढून त्यांच्या ज्ञानात भर पडते, असे मत व्यक्त केले. प्राचार्य मुकेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी अशा सर्जनशील उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

